महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स् इन्स्टिट्यूट
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - १० वी, १२ वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी
- इलेक्ट्रिकल सुपरवायझर
- इलेक्ट्रिकल वायरमन
- टू-व्हीलर मेकॅनिक
- A.C. मेकॅनिक
- कॉम्प्युटर ऑपरेटर
- ॲटोमोबाईल टेक्निशियन
- मोटार वायडिंग
- फोर व्हीलर मेकॅनिक
- वेल्डर / प्लंबर
- कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : ९८२२०९७०७१

दैनिक सोलापूर

# कटूसत्य

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...
दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)

डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल / व्हॉटस्ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक ३१ वा | मंगळवार, दि. १९ ऑगस्ट २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

विकणे /भाड्याने देणे आहे
वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.
संपर्क : डी. बी. शिंदे
मो.: ९५७९४२१४६५ ८२७५२७४२५३
पत्ताः अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

# महाराष्ट्रातील मतदार याद्याही बोगसचं ?

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** बिहारमधील मतदार याद्या अद्ययावत करण्यावरुन रणकंदन माजले असताना आता महाराष्ट्रातील मतदार याद्यांवरही संशयाचे धुके वाटू लागले आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील घुग्गुसमध्ये एकाच धमार्चे ११९ मतदार एकाच घरातले असल्याचे समोर आले आहे. स्वतः घरमालकच चकित ढाले की, एवढे लोक आपल्या पत्त्यावर कसे ? पालघर जिल्ह्याच्या नालासोपारामध्ये मतदार म्हणून एकोणचाळीस वर्षीय महिलेचे नाव सहा वेळा आढळले आहे.महाराष्ट्रातही मतदार याद्यांच्या पुनरीक्षणाची मोहीम हाती घेतली तर या याद्यांच्या अचूकतेबाबतच्या शंका योग्य की अयोग्य, हे ठरेल.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण तालुक्यात तब्बल २५,८२० मतदारांची नावे दुहेरी नोंद झाल्याचे धक्कादायक आरोप होत असल्याची बातमी समोर आली आहे.

प्रश्न असा की हीच नावे मागील लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्या मतदार याद्यांमध्ये होती का ?या दुहेरी नोंदीच्या आधारावर मागील निवडणुकांमध्ये किती दुहेरी



मतदान झाले ?

मागील निवडणुकांत मोठ्या प्रमाणात बोगस मतदान झाले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. आणि केवळ एका तालुक्यात एवढा मोठा घोळ झालेला असेल तर इतर मतदारसंघांमध्ये किती गंभीर गोंधळ असू शकतो, याची कल्पनाच करवत नाही.

म्हणूनच महाराष्ट्रातील सर्व मतदारसंघांच्या मतदार याद्यांची स्वायत्त, सखोल आणि पारदर्शक चौकशी न्यायालयाच्या माध्यमातून करणे अत्यावश्यक आहे. म्हणजे संपूर्ण वास्तव जनतेसमोर येइल. निवडणूक आयोग आणि प्रशासनाने या चौकशीसाठी तातडीने पावले उचलली पाहिजेत.

काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी मतदार याद्यांमध्ये कसा घोळ झाला याचे पुरावे दिल्यामुळे देशभरात खळबळ उडाली आहे. आता महाराष्ट्रातही मतदार यादीतले घोळ मोठ्या प्रमाणात समोर येत आहेत. महाराष्ट्र आणि कर्नाटक विधानसभा निवडणुकीत निवडणूक आयोगानं बनावट मतदारांच्या मदतीनं भाजपला मदत केल्याचा आरोप राहुल गांधींनी केला होता. त्या पार्श्वभूमीवर राज्यात 4 मोठे घोळ उघड झाले आहे. त्यामुळे मतदार याद्यांवर संशय व्यक्त केला जातोय.पैठण, चंद्रपूर, नालासोपारा आणि नाशिक राज्यातील ही चार ठिकाणं. पण यांच्यात एक समान धागा आहे, तो म्हणजे घोळ.

पैठण शहरात जवळपास सव्वीसशे मतदारांची नावं डबल आहेत. पैठणमधून इतर ठिकाणी स्थलांतरित झालेल्या मतदारांची ही नाव आहेत. इतरत्र स्थायिक झालेल्या मतदारांनी आधी असलेल्या मतदार यादीतील नावे वगळली नाहीत. त्यामुळे दुहेरी नावं असल्याचं प्रशासनाकडून सांगण्यात आलंय.

तर राहुल गांधींनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भाजपनं मतचोरी आणि बनावट मतदानातून विजय मिळवल्याचा आरोप केला होता. तसंच महाराष्ट्रात 5 महिन्यात 40 लाख मतदार वाढल्याचा दावाही राहुल गांधींनी केला होता. आणि त्यानंतर राज्यात मतदार यादीतील घोळांची मालिकाच सुरू झाली आहे. (पान 2 वर..)

# तानाजी सावंतांचे बंधू शिवाजी सावंतांचा भाजप प्रवेश निश्चित

## मुख्यमंत्र्यांच्या भेटीनंतर जाहीर केला निर्णय



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शिवसेनेचे माजी जिल्हा संपर्कप्रमुख शिवाजी सावंत, माजी उपमहापौर दिलीप कोल्हे यांच्यासह समर्थकांनी रविवारी (ता. 17 ऑगस्ट) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली.

त्या भेटीत सावंत आणि समर्थकांचा भाजप प्रवेश निश्चित झाला आहे. मुख्यमंत्र्यांनी सावंतांना मुंबई भेटीचे निमंत्रण दिले आहे. येत्या दोन ते तीन दिवसांत मुख्यमंत्र्यांच्या भेटीची वेळ मिळणार असून त्याचवेळी पक्षप्रवेशाची तारीख निश्चित केली जाणार आहे. माजी उपमहापौर कोल्हे यांनी याबाबतची माहिती दिली आहे.

शिवसेनेच्या कामकाजात विश्वासात घेतले जात नाही, माढा मतदारसंघातील पक्षसंघटनेतील नियुक्त्या परस्पर न सांगता केल्या जात असल्याने संपर्कप्रमुख शिवाजी सावंत यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. राजीनाम्यानंतरही पक्षश्रेष्ठींकडून साधी विचारणाही न झाल्याने चिडलेल्या सावंतांनी शिवसेना सोडण्याचा निर्णय पक्का केला आहे.

शिवाजी सावंत यांनी शनिवारी (ता. 16 ऑगस्ट) पालकमंत्री जयकुमार गोरे यांची सोलापुरात वाडिया हॉस्पिटलमध्ये भेट घेतली होती. त्या दोघांमध्ये बंद दाराआड चर्चा झाली होती. त्यानंतर रविवारी (ता. 17 ऑगस्ट) सोलापूरच्या दौऱ्यावर आलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची शिवाजी सावंत आणि त्यांच्या समर्थकांची भेट घेतली. त्या भेटीत सावंतांनी भाजपमध्ये प्रवेश करण्याची तयारी दाखवली आहे.

शिवाजी सावंत आणि त्यांच्या समर्थकांना मुख्यमंत्र्यांनी मुंबई भेटीसाठी येण्याची सूचना दिली आहे. त्यानुसार येत्या काही दिवसांत सावंत समर्थक हे मुख्यमंत्र्यांच्या भेटीसाठी मुंबईला जाणार आहेत, त्यानंतर भाजप प्रवेशाचा कार्यक्रम हा मुंबई, सोलापूर की माढ्यात करायचा, याचा निर्णय होणार आहे.

दरम्यान, माजी उपमहापौर दिलीप कोल्हे यांनी (ता. १८ ऑगस्ट) सोलापुरात पत्रकार परिषद घेऊन भाजप प्रवेशाचा निर्णय जाहीर केला आहे. त्यात त्यांनी शिवाजी सावंत, त्यांचे सुपुत्र ऋतुराज सावंत, स्वतः कोल्हे यांच्यासह प्रवेश करणाऱ्या शेकडो कार्यकर्त्यांची यादी दिली आहे. त्यानुसार माजी आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांचे बंधू शिवाजी सावंत यांनी भाजप प्रवेशाचा निर्णय जाहीर केला आहे.

भाजप प्रवेशाचा निर्णय जाहीर करताना माजी उपमहापौर दिलीप कोल्हे यांनी सोलापूर संपर्कप्रमुख महेश साठे यांच्यावर टीकास्त्र सोडले. साठे हे तुम्हाला भारी पडले का, असे विचारले असता साठे हे टायगर आहेत, त्यामुळे ते भारी पडणारच ना. साठेंची आता शिकार होईल ना. दोन-तीन महिन्यांत, अशी बोचरी कोल्हे यांनी शिवसेना नेते साठे यांच्यावर केली आहे.

# सरन्यायाधीश गवईंनी टोल वसुलीवरून सरकारला दाखवला आरसा

**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** मुसळधार पावसामुळे सोमवारी मुंबई जणू ठप्प झाली आहे. अनेक रस्ते जलमय झाले असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. दुसरीकडे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी देशाच्या राजधानीतील स्थितीवरून सरकारला आरसा दाखवला आहे. टोलवसुलीच्या एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान सरन्यायाधीशांनी दोन तासांच्या पावसात संपूर्ण शहर लकवाग्रस्त होते, अशी टिप्पणी केली आहे.



टोलवसुलीबाबतही सरन्यायाधीश गवईंनी मोठे विधान केले आहे.

सुप्रीम कोर्टाने केरळमधील एका हायवेवर 12 तासांच्या वाहतूककोंडीवर प्रश्न उपस्थित केला. एखाद्या व्यक्तीला संबंधित रस्त्यावर 12 तास लागत असतील तर त्याने टोल का द्यावा ?, असे सरन्यायाधीश म्हणाले आहेत. केरळातील त्रिशूर जिल्ह्यात एनएच 544 वरील टोलशी संबंधित याचिकेवर आज सुनावणी झाली.

केरळ हायकोर्टाने हायवेच्या खराब स्थितीमुळे टोल वसुलीला मनाई केली आहे. त्याविरोधात 'एनएचएचआय'ने सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली आहे. त्यावर झालेल्या सुनावणीनंतर कोर्टाने निकाल राखून ठेवला आहे. सरन्यायाधीश गवई, न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन आणि न्यायमूर्ती एन. व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

कोर्टाने सुनावणीदरम्यान वारंवार मागील आठवड्यात हायवेवर झालेल्या 12 तासांच्य वाहतुककोंडीचा उल्लेख केला. रस्ता सुस्थितीत नसताना टोलवसुली कशी (पान 2 वर..)

# मोहोळ तालुक्यातील वाळूजमध्ये बिबट्याचा वावर

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ तालुक्यातील वाळूज (दे) येथील जाधववस्ती परिसरात ऊसाच्या शेतात बिबट्याच्या पायाचे ताजे ठसे आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे. वनविभागाने हे ठसे बिबट्याचेच असल्याचे स्पष्ट केल्याने शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

वनविभागाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

वाळूज-कळमण रस्त्यावरील 'काटओढा' परिसरात शुक्रवारी सकाळी पांडुरंग कोळी हे नेहमीप्रमाणे शेळ्या चारण्यासाठी गेले होते. यावेळी मारुती कादे यांच्या ऊसाच्या शेतातील चिखलात त्यांना प्राण्याच्या पायाचे मोठे ठसे दिसले. त्यांनी तात्काळ ग्रामपंचायत सदस्य अमोल कादे यांना याची माहिती दिली. कादे यांनी प्रसंगावधान राखून या ठशांचे फोटो वनविभागाच्या अधिकाऱ्यांना पाठवले.

वनपरिक्षेत्र अधिकारी योगेश घोडके यांनी हे ठसे बिबट्याचेच असल्याचा दुजोरा दिला. माहिती मिळताच, वनविभागाचे एक पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले असून, त्यांनी परिसरात गस्त घालण्यास सुरुवात केली आहे. बिबट्याचा माग काढण्यासाठी शोधमोहीम हाती घेण्यात आली आहे.



**वनविभागाकडून सतर्कतेचा इशारा**

या घटनेनंतर वनविभागाने नागरिकांसाठी काही सूचना जारी केल्या आहेतः शेतकऱ्यांनी शेतात एकट्याने जाऊ नये. सोबत काठी ठेवावी. रात्रीच्या वेळी बाहेर पडताना टॉर्चचा वापर करावा आणि मोबाईलवर मोठ्या आवाजात गाणी लावावीत. आपली जनावरे सुरक्षित आणि बंदिस्त गोठ्यात बांधावीत. कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता थेट वनविभागाशी संपर्क साधावा.

"सदरचे ठसे हे बिबट्याचेच आहेत याची खात्री केली आहे. सदर प्राण्याने अद्याप कोणत्याही पाळीव प्राण्यावर किंवा मानवी वस्तीत माणसावर,शेळ्यांवर हल्ला केलेला नाही.अफवांवर विश्वास ठेवू नये. आमची टीम तेथे रवाना झाली आहे व त्यावर लक्ष ठेवून आहे. नागरिकांनी सतर्क रहावे एकट्याने बाहेर पडू नये रात्री अंधारात बाहेर जाण्याचे टाळावे."

**- योगेश घोडके,** वनाधिकारी (आरएफओ) मोहोळ

# डीजे डॉल्बीच्या विरोधात एकवटले हजारो सोलापूरकर

## एक लाख स्वाक्षरी मोहिमेत २४ हजार सोलापूरकरांनी केल्या स्वाक्षऱ्या



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नागरिकांच्या शारीरिक, मानसिक आणि सामाजिक स्वास्थ्यासाठी अत्यंत घातक ठरणाऱ्या डीजे डॉल्बीला सोलापुरात वर्षभर कायमस्वरूपी १०० टक्के बंदी आणावी या मागणीसाठी हजारो सोलापूरकर सोमवारी एकवटले. ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर मंदिरात सजग सोलापूरकर समितीतर्फे आयोजित करण्यात आलेल्या एक लाख स्वाक्षरी मोहिमेत पहिल्याच दिवशी तब्बल २४ हजार सोलापूरकरांनी स्वाक्षरी करीत डीजे डॉल्बीला कडाडून विरोध दर्शविला.

सोमवारी सकाळी ६ ते रात्री ११ अशी तब्बल सलग १५ तास ही स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली. सोलापूरकर समितीच्या सदस्यांनी सोलापूरकरांना डीजे डॉल्बीचे धोके समजावून सांगत प्रबोधन केले. यावेळी सोलापूरकरांनी उत्स्फूर्तपणे स्वाक्षरी मोहिमेत सहभाग घेऊन डीजे डॉल्बीला विरोध केला.


सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांनीही या स्वाक्षरी मोहिमेत स्वाक्षरी करून सोलापूरकरांना डीजे डॉल्बी पासून उद्भवणारे आजार, धोके सांगत प्रबोधन केले आणि कर्णकर्कश डीजे डॉल्बीपासून सोलापूरकरांनी दूर राहात पारंपारिक वाद्याला प्राधान्य द्यावे असे आवाहन केले.


यावेळी प्रशासकीय अधिकारी, डॉक्टर, वकील, नगरसेवक, राजकीय क्षेत्रातील नेतेमंडळी, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, उद्योगपती, व्यापारी, शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी, महिला संघटनांच्या प्रतिनिधी आदींनी या स्वाक्षरी मोहिमेत सहभाग घेतला.

सोलापुरातील ज्या सामाजिक संस्था संघटना आणि व्यक्तींना डीजे डॉल्बी मुक्त सोलापूर अभियानात सहभागी व्हायचे आहे त्यांनी ९८६०८२२२८३ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन सजग सोलापूरकर समितीतर्फे करण्यात आले आहे.

**पोलीस आयुक्त, जिल्हाधिकारी आणि मुख्यमंत्र्यांना देणार**

सजग सोलापूरकर समितीतर्फे एक लाख सोलापूरकरांच्या स्वाक्षऱ्या घेऊन डीजे डॉल्बी बंद करण्याबाबतचे निवेदन सोलापूरचे पोलीस आयुक्त एम. राजकुमार, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात येणार आहे.




निरामय पॅरालिसिस सेंटर
निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा ॲण्ड फिजिओथेरपी सेंटर
ISO 9001:2015
खात्रीशीर उपचार 100% गॅरंटी आयुर्वेदिक व अलोपॅथी तज्ञांच्या निगराणीमध्ये
कितीही जुने पॅरालिसिस असो आयुर्वेदिक व अलोपॅथी उपचार पद्धतीने पंधरा ते वीस दिवसानंतर रिझल्ट येण्यास सुरुवात होते. हात काम करत नाही, चालता येत नाही, ब्रेनचा कंट्रोल जाणे बेडवर आहात काळजी करू नका खात्रीशीर उपचार

नांत आपुलकीचं, जिव्हाळ्याचं, माणुसकीचं आणि आधाराचं
समाजातील प्रत्येक घटकाशी ऋणानुबंध जपणारी संस्था
मोबाईल नं. 9503310568
पत्ता: गोळवलकर हॉस्पीटल च्या पाठीमागे, सुळे नगर, मोहोळ, जि. सोलापुर

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री- पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ.अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S.,M.D (A.M) , M.D (Acu ).,P. G ( Sexology )
२१ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
१ लाखांहून अधिक रुग्णांवर यशस्वी उपचार
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

## संपादकीय

# शक्ती संतुलन

गेल्या दशकभरातील केंद्र सरकारचे परराष्ट्र धोरण हे दीर्घकालीन भू-राजनीतिक गणितांवर आधारलेल्याचे दिसून आले आहे. भारत सरकारच्या परराष्ट्र धोरणाचा भर हा प्रामुख्याने बहुपर्यायी सिद्धांतावर आधारलेला आहे. त्यामुळेच गेल्या दहा वर्षात अनेक छोट्या देशांसोबत भारताने आर्थिक-व्यापारी व सांस्कृतिक संबंध प्रस्थापित करण्यासाठी पुढाकार घेतल्याचे दिसून आले आहे. यामुळेच आज थेट जागतिक महासत्ता असणाऱ्या अमेरिकेच्या दबावशाहीपुढे कणखरपणाने उभे राहण्याची क्षमता भारताला प्राप्त झाली. उझबेकिस्तान या मध्य आशियातील देशाकडे वळलेले भारताचे लक्ष हे याचे सूचक म्हणून पाहता येईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उझबेकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष शौकत मिर्झियोयेव यांच्यात नुकतीच दूरध्वनीवरून चर्चा पार पडली.

या संवादादरम्यान राष्ट्राध्यक्ष मिर्झियोयेव यांनी भारताच्या 79व्या स्वातंत्र्यदिनीच्या पूर्वसंध्येला भारताच्या जनतेस हार्दिक शुभेच्छा दिल्या. दोन्ही नेत्यांनी व्यापार, संपर्क, आरोग्य, तंत्रज्ञान आणि जनतेतील परस्परसंबंध यांसारख्या अनेक महत्त्वाच्या क्षेत्रांतील द्विपक्षीय सहकार्याच्या प्रगतीचा आढावा घेतला. याशिवाय, प्रादेशिक व जागतिक विषयांवरही चर्चा झाली आणि भारत-मध्य आशिया यांच्यातील प्राचीन नातेसंबंध अधिक बळकट करण्याची बांधिलकी पुन्हा अधोरेखित करण्यात आली. उझबेकिस्तानसोबतचे भारताचे संबंध वृद्धिंगत करणे म्हणजे एकाच वेळी अनेक लाभ मिळविण्याची संधी ठरणार आहे. अफगाणिस्तानातील अस्थिरता आणि पाकिस्तानच्या अडथळ्यांमुळे भारताला मध्य आशियाशी थेट व्यापारी आणि ऊर्जा मार्ग जोडण्यात अडचणी आल्या आहेत. अशा वेळी उझबेकिस्तानशी वाढणारे संबंध भारताला इराणच्या चाबहार बंदरावाटे आणि आंतरराष्ट्रीय उत्तर-दक्षिण परिवहन कॉरिडॉरद्वारे (आयएनएसटीसी) नवे मार्ग उघडण्याची संधी देऊ शकतील. चीनच्या 'बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह'च्या वर्चस्वाला संतुलन देणारी भूमिका आहे. आजवर चीन आणि रशियाच्या प्रभावाखाली राहिलेला उझबेकिस्तान, भारताच्या भागीदारीतून एक पर्यायी कूटनीतिक व आर्थिक आधार शोधू शकतो. अफगाणिस्तानच्या जवळ असलेला हा देश, दहशतवाद-प्रतिबंधक सहकार्यातही महत्त्वाचा भागीदार आहे. भारतासोबतच्या सहकार्याने उझबेकिस्तान दहशतवादी नेटवर्क कमकुवत करण्यास मदत करू शकतो.

याशिवाय शांघाय सहकार्य संघटना या बहुपक्षीय मंचावर उझबेकिस्तानचे पाठबळ मिळाल्यास भारताला मध्य आशियातील राजकीय-सुरक्षा चर्चांना आपल्या प्राधान्यानुसार घडवण्याची ताकद मिळू शकते. द्विपक्षीय सहकार्यातील प्रगतीचे पुनरावलोकन आणि सामरिक भागीदारी पुढे नेण्याचा निर्धार याचे दूरगामी परिणाम संभवतात. भौगोलिकदृष्ट्या पाहिल्यास उझबेकिस्तान मध्य आशियाच्या मध्यवर्ती स्थानी असून अफगाणिस्तान, ताजिकिस्तान, किर्गिस्तान, कझाकिस्तान आणि तुर्कमेनिस्तान या देशांच्या सीमांनी वेढलेला आहे. त्यामुळे तो भारताला मध्य आशिया, रशिया आणि युरोपपर्यंत जोडणारा महत्त्वाचा कनेक्टिव्हिटी नोड ठरू शकतो.

विशेष म्हणजे अफगाणिस्तानशी संलग्न सीमा असणारा हा देश भारताच्या दहशतवादविरोधी धोरणात महत्त्वाची भूमिका निभावू शकतो. उझबेकिस्तान हा सोने, युरेनियम, नैसर्गिक वायू यांसारख्या नैसर्गिक संपत्तीने समृद्ध असणारा देश आहे. हा देश कापसाचा मोठा उत्पादक आहे. भारताला ऊर्जा सुरक्षेसाठी विविध स्रोतांची गरज आहे; त्यामुळे गॅस आणि युरेनियम पुरवठ्यासंबंधी होणारे करार भारतासाठी महत्त्वाचे ठरतात. त्याशिवाय औषधनिर्मिती, माहिती-तंत्रज्ञान, वस्त्रोद्योग आणि मोटारउद्योग या क्षेत्रांत उझबेकिस्तान ही उगवती बाजारपेठ असून तिथे भारतीय उद्योगांना मोठी संधी आहे. चाबहार बंदर आणि आयएनएसटीसी मार्गाने उझबेकिस्तानला जोडणे भारताच्या व्यापाराला गती देऊ शकते.

संरक्षण सहकार्यातही दोन्ही देशांची भागीदारी पाहिल्यास संयुक्त लष्करी सराव, दहशतवादविरोधी प्रशिक्षण, गुप्तचर माहितीची देवाणघेवाण यामुळे ती बहुपदरी आहे. अफगाणिस्तानातील अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर हे सहकार्य विभागीय शांततेसाठी आवश्यक आहे. उझबेकिस्तानला भारतीय संरक्षण तंत्रज्ञान व प्रशिक्षणाचा लाभ होऊ शकतो, तर भारताला मध्य आशियाशी कनेक्टिव्हिटीचे लाभ मिळू शकतात. ऐतिहासिकदृष्ट्या विचार करता, संस्कृत व पाली साहित्यातील 'काम्बोज' या उल्लेखात सध्याच्या उझबेकिस्तानच्या काही भागांचा समावेश मानला जातो. 'उत्तरपथ' या प्राचीन व्यापारी मार्गाचा काही भाग उझबेकिस्तानातून जात असे. इतिहासात फरगाना, समरकंद आणि बुखारा ही शहरे भारताला युरोप व चीनशी जोडणारी प्रमुख व्यापारिक केंद्रे होती.


समरकंद आणि बुखारा येथे स्थायिक झालेले भारतीय व्यापारी स्थानिक अर्थव्यवस्थेचा अविभाज्य भाग बनले होते. शतकानुशतकांच्या या संपर्कामुळे स्थापत्यकला, नृत्य, संगीत आणि पाककृतींमध्येही घट्ट सांस्कृतिक नातेसंबंध निर्माण झाले. मिर्झा गालिब आणि अमीर खुसरो यांसारखे महान कवी-कलावंत उझबेक वंशाशी संबंधित होते. उझबेक विद्यार्थ्यांसाठी भारतीय विद्यापीठे, विशेषतः वैद्यकीय आणि तांत्रिक शिक्षण हे आकर्षणाचे केंद्र आहे. सारांश असा की भारत-उझबेकिस्तान संबंध हे फक्त व्यापार किंवा संरक्षणापुरते मर्यादित नसून, ते बहुआयामी असून सर्वच स्तरांवर परिणाम घडवू शकणारे आहेत.

सामरिक दृष्टिकोनातून उझबेकिस्तान हा भारतासाठी एक भूराजकीय 'चौक' असून तेथून दक्षिण आशिया, मध्य आशिया आणि युरोपला जोडणारे अनेक मार्ग जातात. भारताने या देशासोबतच्या भागीदारीचा अधिक सखोल विकास केला, तर ते केवळ द्विपक्षीय फायद्यापुरते मर्यादित राहणार नाही, तर नव्या प्रादेशिक शक्ती-संतुलनाची पायाभरणी करेल.

# जंगलतोड, शहरीकरण व औद्योगिकरणाला जबाबदार कोण ?

## याचे प्रायश्चित्त मुक्या पशुपक्षांनी किंवा प्राण्यांनी का भोगावे?

आज देशात वाढते प्रदुषण, शहरीकरण, औद्योगिकीकरण, वृक्षांची कत्तल आणि मोठमोठे टॉवर यामुळे स्थल, जल, वायुचे वातावरण दुषित झाले आहे यामुळे मानव, पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतू यांचे जगने अत्यंत कठीण झाले आहे आणि वाढत्या प्रदुषणामुळे अनेक वृक्ष, पशुपक्षी लुप्त झाले आहेत किंवा लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत.परंतु मानव बुध्दीजीवी प्राणी असल्यामुळे मुक्या प्राण्यांवर कोणत्याही प्रकारचा अत्याचार किंवा अन्याय होणार नाही याची जातीने काळजी घेतली पाहिजे व योग्य ती उपाययोजना केली पाहिजे.अन्यथा मुक्या प्राण्यांमध्ये व आपल्यामध्ये काहीच फरक रहाणार नाही. आज राज्यासह संपूर्ण देशात मानवांच्या सुखसुविधांसाठी मोठ्या प्रमाणात जंगलतोड सुरू असुन देशातील अनेक भागांत शहरीकरण,औद्योगिकरण,परमाणु परिक्षण व रस्त्यांचे जाळे मोठ्या प्रमाणात दिसून येते.यामुळेच मोठ्या प्रमाणात जंगलसंपदा नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत आणि हा प्रकार फक्त भारतातच नसुन संपूर्ण जगात सुरू आहे.परंतु याचे प्रायश्चित्त आज मानव,पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतूंना भोगावे लागत आहे.देशात दिवसेंदिवस लावारीस कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे आणि लावारीस कुत्र्यांची संख्या वाढण्यामागे स्थानिक प्रशासन जबाबदार आहे. कारण स्थानिक प्रशासनांना माहीत असते की कुत्रा चावला तर त्याचा काय परिणाम होतो तरी स्थानिक प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत असते त्यामुळेच आज भारतात लावारीस कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येते. एका आकडेवारी नुसार असे सांगण्यात येते की देशात दररोज १० हजार नागरिकांना कुत्रे चावा घेतात व यात अनेकांना रेबीज आजार होतो किंवा अनेकांचा मृत्यू सुध्दा होतो.यावरून आपण समजू शकतो की स्थानिक प्रशासनाच्या चुकांमुळे हा भयंकर प्रकार होत. स्थानिक प्रशासनाने वेळीच लावारीस कुत्र्यांवर आळा घातला किंवा नसबंदी केली असती तर अनेकांचा जीव वाचला असता किंवा चाव्यांचे प्रकार टाळता आले असते.त्यामुळे आता आदेश, निर्देश खूप झाले आता अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची गरज आहे.त्याचप्रमाणे सध्याच्या परिस्थितीत कबुतरांना खाद्यबंदीचा वाद जोरदार उफाळल्याचे दिसून येते आणि हा मुद्दा आता मुंबई महापालिका,सरकार आणि हायकोर्ट अशा पध्दतीने सुरू आहे.महत्वाचा मुद्दा असा की कबुतरांना खाद्यबंदीचा का करावी? आपण संपूर्ण जंगल संपुष्टात आणले कबुतर हा तर छोटासा पक्षी आहे.आज जंगलतोडीमुळे वाघ,बंदर, बिबट्या, अस्वल इत्यादी अनेक हिंसक पशु शहरात व गावात सरळ प्रवेश करीत आहेत व यामुळे मोठ्या प्रमाणात जीवीत हानी सुध्दा झाली आहे व होत आहे.बंदरांचा विचार केला तर जनु काय त्यांच्याशाठी जंगल संपुष्टात आले की काय असे त्यांना वाटत आहे. त्यामुळे आज देशातील अनेक शहरात किंवा गावांमध्ये बंदर मोठ्या प्रमाणात दिसून येतात व मोठ्या प्रमाणात नुकसान सुध्दा करतात.परंतु याला कारणीभूत कोण?याचा विचार सरकार, प्रशासन व स्थानिक प्रशासन का करीत नाही? म्हणजे आपणच त्यांच्यावर अत्याचार व अन्याय करायचा आणि आपण त्यांच्या पासून नुकसानीचा धडा सर्वसामान्यांना शिकवायचा ही बाब कितपत योग्य म्हणावी! कबुतरांच्या बाबतीत वाढता रोष पहाता कबुतरखाना बंद करण्याच्या भुमिकेत असलेल्या मुंबई महापालिकेने मवाळपणा दाखवित सकाळी ६ ते ८ या दोन तासांच्या काळात कबुतरांना खाद्य टाकण्याची परवानगी देण्याच्या विचारात असल्याची माहिती मुंबई उच्च न्यायालयाला १३ ऑगस्टला दिली.माझ्या माहितीनुसार मुंबई महापालिका किंवा राज्य सरकार मुक्या पक्षांवर (कबुतरांवर) एकाकी त्यांच्या खाण्यावर बंदी घालु शकत नाही.कारण कबुतरांसारख्या अनेक जंगली पक्षांना शहरात आणण्यास स्वतः सरकार, प्रशासन व स्थानिक प्रशासन जबाबदार आहे.त्यामुळे कबुतर असो व अन्य प्राणी त्यांच्या खाण्यापीण्याची व्यवस्था सरकारने प्रथम करावी नंतर सर्वसामान्यांना सांगावे की त्यांना खाद्य टाकावे किंवा नाही. गुन्हा सरकारने व प्रशासनाने करावा आणि त्याचे प्रायश्चित्त मुक्या पशुपक्षांनी भोगावे हा कुठला न्याय म्हणावा! असे सांगितले जाते की कबुतरांमुळे ६० प्रकारचे आजार होऊ शकतात त्यात मुख्यत्वे करून अस्थमा सारख्या आजारांचा समावेश आहे.ही बाब ठीक याचे आम्हीपण समर्थ करतो.परंतु शहरात कबुतरांचा एवढा लोंढा कसा काय आला यांचाही विचार सरकारने केला पाहिजे.कारण एवढे कबुतर एकाएकी शहरात आले नसुन ते प्रशासनांच्या चुकांमुळे आले आहेत यालाही नाकारता येणार नाही.त्यामुळे सरकारने कबुतरखान्याच्या बाबतीत गांभीयार्ने विचार करावा नंतरच योग्य तो निर्णय घ्यावा.आजही राज्यातील अनेक शहरांमध्ये मोकाट गायी फिरतात त्यांना कोण खाद्य खाऊ घालणार याचा विचार सरकार का करीत नाही? मोकाट गायींची सुरक्षा निश्चित करण्यासाठी व योग्य खाद्य मिळावे यासाठी सरकार त्यांना गोशाळेत का नेत नाही?ते तर पाळीव प्राणी आहेत.म्हणजेच सरकार,प्रशासन व स्थानिक प्रशासन लोकांना सांगे ब्रह्मज्ञान आणि स्वतः कोरडे पाषाण अशी परिस्थिती सरकारची दिसून येते. कुत्रा हा पाळीव प्राणी आहे.परंतु लावारीस कुत्र्यांची वाढती संख्या पहाता त्यांचा बंदोबस्त स्थानिक प्रशासनाने ताबडतोब करायला हवा.त्याचप्रमाणे मोकाट गायी शहरात मोठ्या प्रमाणात फिरतात अशा परिस्थितीत त्यांच्या खाण्यामध्ये अनेक विषेली पदार्थ सुध्दा येतात व यामुळे त्यांची जिवीत हाणी सुध्दा होते.त्यामुळे सरकारने अशा प्राण्यांची व्यवस्था ताबडतोब गोशाळेत केली पाहिजे.त्याचप्रमाणे कबुतर,बंदर किंवा अन्य जंगलातील पशुपक्षी शहरात किंवा गावात का येत आहे याचाही गांभीर्याने विचार करून ताबडतोब जंगलतोड थांबविली पाहिजे व वाढते शहरीकरण रोखले पाहिजे अशा पध्दतीने सरकारने विचार केला तर कालांतराने जंगलात सहवास करणारे संपूर्ण पशुपक्षी शहरात किंवा गावात येने हळूहळू कमी होईल व त्यांचे आयुष्य वाढेल. यासाठी सरकारला वृक्षलागवडीचा मोठा उपक्रम राबविने गरजेचे आहे.कारण वृक्षांच्या अभावामुळे पशुपक्ष्यांचे जगने अत्यंत कठीण झाले आहे.या संपूर्ण गोष्टींचा विचार सरकारने मोठ्या गंभीरतेने घेतला पाहिजे.पशुपक्षांच्या बाबतीत निर्माण झालेले वैरत्व संपुष्टात आणण्याची जबाबदारी सरकारची आहे. त्या अनुषंगाने सरकारने पाऊल उचलायला हवे व मानव आणि पशुपक्षी यांच्यातील मैत्रीपुर्ण संबंध प्रस्थापित करण्यासाठी जास्तीत जास्त भर दिला पाहिजे.पुर्वी चिऊताईच्या नावांनी आई घास भरवायची,परंतु आज चीमण्या सुध्दा अनेक क्षेत्रांतुन लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. त्याचप्रमाणे कावळे सुध्दा कमी प्रमाणात दिसतात. मानवाने स्वतःच्या आरोग्याची जोपासना अवश्य करावी.परंतु पशुपक्ष्यांच्या रक्षणाचा सुध्दा विचार करावा.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

## प्रबोधन

# धन्य दानवृत्ती । धन्य त्यांची प्राप्ती

भारतीय भाषांनी महाभारत ह्या महाकाव्या- पासून यक्षप्रश्न हा शब्दप्रयोग देणगी म्हणून हे घेऊन स्वतःला समृद्ध केलं असेल. पण यक्षाने धर्मराजाला विचारलेले हे सुमारे शंभर यक्षप्रश्न वस्तुनिष्ठ (Objective) नव्हते, तर व्यक्तिनिष्ठ (Subjective) होते. म्हणजेच यक्ष काहीही विचारत होता आणि धर्मराज तशीच फालतू उत्तरं देत होता. उदाहरणार्थ, यक्षाचा पहिलाच प्रश्न किती चुकीचा होता ते पाहाः- सूयार्ला कोण उगवतो? वास्तविक, सूर्य स्वतः उगवतो. पण हे उत्तर संस्कृती नावाच्या व्यवहारात अडकलेल्या यक्षाला चाललं नसतं. धर्मराजाने म्हणूनच उत्तर दिलं, ब्रह्मा सूयार्ला उगवतो! आणि हे उत्तर यक्षाने स्वीकारलं. धर्मराजाला मिळाले पैकीच्या पैकी गुण. तरी बरं यक्षाने, श्रीमंत कोण ? त्याची दानधर्मवृत्ती केव्हा सक्रिय होते? आणि ती खरी की खोटी? असे प्रश्न विचारले नाहीत. नाही तर वनपवार्तील ह्या प्रश्नांबरोबरच व्यासांची उदंड प्रतिभा पोथी गुंडाळून वनवासी झाली असती. कारण ह्या प्रश्नाने धर्मराज निरुत्तर झाला असता, बेशुद्ध पडलेले पांडव मेले असते आणि नायकांअभावी महाकाव्याचं खंडकाव्य झालं असतं.

पण श्रीमंत कोण? असा प्रश्न ऐकताच धर्मराज नक्की म्हणाला असता, 'जो ब्रह्मवृंदांना संतुष्ट होण्याइतकं धन अर्पण करतो, यज्ञयाग करतो, भूदेवांना इच्छाभोजन देतो, त्याला श्रीमंत म्हणता येईल किंवा गरिबांनी आश्चर्यचकित व्हावं इतकं सोनं- नाणं, जडजवाहिर बालाजी, जगन्नाथ, सोमनाथ, महालक्ष्मी यांना जो अर्पण करतो, तो श्रीमंत!' या श्रीमंतांचं दान हे दान असेल, पण ह्या श्रीमंतांना दाता ही पदवी मात्र देता येणार नाही. कारण त्यांचं दान देणं हे दातृत्वात बसत नाही. चतुर संस्कृत सुभाषितकारांनी शतेषु जायते शूरः असा प्रारंभ असणाऱ्या सुभाषिताच्या शेवटी जे कटू सत्य व्यक्त केलं आहे, ते अत्यंत मर्मभेदक तसंच चिंतनीय आहे. त्यात म्हटलंय- शंभरात एखादा शूर असतो, हजारात एखादा हुशार असतो, दहा हजारात एखादा वक्ता सापडतो. पण दाता मात्र लाखात, नव्हे कोटीतही असेल, अशी खात्री नसते. आज मठ- मंदिरांच्या दानपेट्या भरून ओसंडत आहेत त्या दानकऱ्यांमुळे दातृत्वामुळे नव्हे!

बापकमाईने श्रीमंत होणं सोपं आहे; लॉटरी लागून धनप्राप्ती होणं हेही शक्य आहे. गोलमाल- दलाली व्यवहारातून आर्थिक सुबत्ता येणं सोपं आहे आणि अशा श्रीमंतांच्या देण्यातून दानपेटी ओसंडणं, हे तर आणखी सोपं आहे. पण अशा श्रीमंतांच्या पदरात दातृत्वाचं श्रेय टाकायला थोर विचारवंतांचा तीव्र विरोध आहे. आपल्या भिकेतील भीक जेव्हा एक दयाळू भिकारी दुसऱ्या भिकाऱ्याला देऊन त्याला जगवतो, तेव्हा सारे विचारवंत दाता म्हणून उदारवृत्तीच्या त्या भिकाऱ्याचा सन्मान करतात आणि त्याच्या दातृत्वाची प्रशंसा करून धन्य धन्य होतात.

महाभारतातील युधिष्ठिराच्या गर्वहरणाची गोष्ट प्रसिद्ध आहे. राजसूय यज्ञात धर्मराजाने खूप दानधर्म केला. त्याचा त्याला गर्व झाला. एकदा त्या यज्ञभूमीत अर्ध अंग सोनेरी झालेलं एक मुंगूस येऊन लोळून पाहू लागलं. पण त्याचं राहिलेलं अंग सोनेरी होईना. निराश होऊन ते तेथून निघून गेल्यावर श्रीकृष्ण युधिष्ठिराला म्हणाला, 'हे मुंगूस एका वृद्ध जोडप्याच्या घरात फिरल्यामुळे अर्ध सोनेरी झालं होतं. त्या वृद्ध जोडप्याने कित्येक दिवसांनंतर मिळालेली भाकरी एका भिकाऱ्याला दिली आणि स्वतः ते भुकेने तडफडून मेले. त्या भाकरीच्या पिठाचे कण लागून हे मुंगूस थोडं सोनेरी झालं. राहिलेलं अंग तुझ्या यज्ञभूमीत लोळूनही सोनेरी होईना म्हणून ते बिचारं निराश होऊन निघून गेलं.' युधिष्ठिराला जे समजायचं ते समजलं. तो दानी होता, पण दाता नव्हता. श्रीमंतांची दानशूरवृत्ती खरी असते काय? ह्या प्रश्नाचं उत्तर म्हणूनच नकारार्थी आहे. तेव्हा दातृत्व आणि दानशूरपणा नीरक्षीरविवेकानेच म्हणजे पाणी आणि दूध चोखपणे वेगळे करूनच पाहिला पाहिजे. कारण -

सवयीने चोर । उठले उशिरा
स्नान भरभरा । आवरले ॥१
पोथीही वाचली। देवही पूजले
स्तोत्रपाठ झाले । सवयीने ॥ २
गाठला व्यापारी । दागिने विकले
खूप खूप आले । त्याचे पैसे ॥३
मंदिरात गेले । पुजाऱ्या म्हणती
अभिषेकासाठी । पाचशे घ्या ॥४
पुजारी म्हणाला । होवोनिया खूश
आजचे विशेष । काय सांगा ? ॥५
लाखाला शंभर । अभिषेकासाठी
बोली आहे केली । देवाजीशी ॥ ६
देऊ हजारही । म्हणती ते चोर
बुद्धी त्यांची थोर । दानधर्मी ॥७
धन्य दानवृत्ती। धन्य त्यांची प्राप्ती
वर्ण अल्पमती । कसे त्यांना? ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# अॅड. प्रदीपसिंग राजपूत तसेच माजी उपमहापौर सुषमाताई घाडगे यांचा राष्ट्रवादीकडून सन्मान

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** स्वातंत्र्य दिनानिमित्त सोलापूर शहर सोशल मिडीया अध्यक्ष वैभव गंगणे कार्याध्यक्ष सोमनाथ शिंदे यांच्या वतीने सोलापूर शहरातील नामांकित जिल्हा मुख्य सरकारी विधिज्ञ अॅड प्रदीपसिंग राजपूत यांना कायद्यातील डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी पीएचडी मिळाल्याबद्दल तसेच आणीबाणी काळात लोकशाहीच्या रक्षणासाठी व मूल्यांच्या जपणूकीसाठी अत्यंत कठोर परिस्थितीतही निडर पणे संघर्ष केला व हुकूमशाहीचा धाडसाने कारावास स्वीकारल्यामुळे महाराष्ट्र शासनाकडून कै मुरलीधर घाडगे पैलवान यांच्या पत्नी माजी उपमहापौर सुषमाताई घाडगे यांचा गौरव करण्यात आला त्यानिमित्त त्यांचा सन्मान राष्ट्रवादी काँग्रेस भवन येथे जिल्हाध्यक्ष संतोष पवार कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांच्या शुभहस्ते फेटा पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला.




याप्रसंगी जिल्हाध्यक्ष संतोष भाऊ पवार कार्याध्यक्ष जुबेर भाई बागवान माजी परिवहन समिती सभापती आनंद मुस्तारे, भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी श्रीकांत घाडगे जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले महिला आघाडी अध्यक्ष संगीता जोगधनकर महिला आघाडी पदाधिकारी उमादेवी झाडबुके शहर उपाध्यक्ष शकील शेख शहर उत्तर विधानसभा कार्याध्यक्ष मनोज शेरला, सांस्कृतिक व नाट्य विभाग अध्यक्ष आशुतोष नाटकर, सामाजिक न्याय विभाग अध्यक्ष अनिल बनसोडे, VJNT सेल विभाग अध्यक्ष रुपेश भोसले वाहतूक सेल विभाग अध्यक्ष इरफान शेख रमिज कारभारी ओबीसी सेल विभाग कार्याध्यक्ष आयुब शेख, मौलाभाई, सोशल मीडिया शहराध्यक्ष वैभव गंगणे, कार्याध्यक्ष सोमनाथ शिंदे दक्षिण विधानसभा अध्यक्ष श्रीकांत वाघमारे कार्याध्यक्ष प्रदीप भालशंकर अजिंक्य उप्पिन यशराज डोळसे निशांत तारानाईक शामराव गांगर्डे शहर उत्तर विधानसभा संघटक प्रकाश झाडबुके यांची उपस्थिती होती.

# 15 ऑगस्ट निमित्त डॉ. हेडगेवार रक्तपेढी येथे झेंडावंदन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** 15 ऑगस्ट 2025 भारतीय भारताच्या स्वातंत्र्य 79 व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त डॉ. हेडगेवार रक्तपेढीमध्ये झेंडावंदनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. रक्तपेढीचे अध्यक्ष सतीश मालू यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी कोषाध्यक्ष सुहास जोशी, संचालिका डॉ किरण सारडा, संचालक गिरीश दर्बी, अभिजीत टाकळीकर, राघवेंद्र मुजुमदार, व्यवस्थापक रंगनाथ जोशी, वैद्यकीय अधिकारी डॉ सुमेधा कंदलगावकर, डॉ. जगन्नाथ बिराजदार, डॉ. राजेंद्र लोणीकर तसेच जनसंपर्क अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.



# अन्नछत्र मंडळाचा दहीहंडी उत्सव उत्साहात साजरा



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व त्यांचे पुत्र प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाच्या वतीने शनिवारी दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

दरम्यान, सकाळी श्रीमंत विजयसिंहराजे भोसले चौक, हन्नूर रस्ता येथील वडार गल्लीत ढोल ताश्यांच्या निनादात गोविंदा पथकांनी मिरवणूकीने येऊन अन्नछत्र मंडळातील दहिहंडी फोडली. गोविंदा पथकांची स्वागत मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांनी केले. त्यानंतर न्यासाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर बांधण्यात आलेली दहीहंडी गोविंदा पथकाने फोडली. दोन वर्षानंतर दहिहंडी उत्सव पार पडत असल्याने गोविंदा पथकांमध्ये मोठ्या प्रमाणावर उत्साह पाहायला मिळाला.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाची सहयोगी संस्था असलेल्या हिरकणी महिला बहुउद्धेशीय संस्थेच्या वतीने श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळा शुक्रवारी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा अलकाताई भोसले, सचिव अर्पिताराजे भोसले, महिला भगिनी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

## वात्रटिका

### दुसऱ्यांनी लढावे

अण्णा आता तरी उठा
पुणेरी बॅनर झळकला...
अण्णांना तरूणाईचा
कल तरी कळला...
चोरी होते आहे तेव्हा
अण्णांनी जागे राहावे...
नव्वदी कडूनच आशा
आणि तरूणाईने झोपावे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

पान १ वरून

# महाराष्ट्रातील मतदार याद्याही...

या पार्श्वभूमीवर मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी मनसैनिकांना मतदारयाद्या तपासण्याचे आदेश दिले आहेत.

चंद्रपूर जिल्ह्यातील घुग्गुस गावात एक अजब प्रकार उघडकीस आला आहे. एकाच घरात तब्बल 119 मतदारांची नोंद सापडलीय. छोट्याशा घरात 119 मतदारांची नोंदणी कशी होवू शकते, असा प्रश्न आता निर्माण झालाय. काँग्रेसच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी मतदार यादीची तपासणी केल्यावर हा प्रकार उघड झाला. 119 मतदार बोगस तर नाहीत ना, अशी शंकाही उपस्थित झालीय.

राज्यात चांदा ते बांदा मतदार यादीतील घोळ पाहायला मिळत आहेत. नालासोपारा विधानसभा मतदारसंघात माता जीवदानी चाळ इथल्या सुषमा गुप्ता या महिलेचं मतदार यादीत तब्बल सहा वेळा नाव असल्याचा प्रकार समोर आलंय. एकाच पानावर सुषमा गुप्ता यांचं नाव सहा वेळा असल्याचं पाहायला मिळतं आहे.

नाशिकमध्ये तर बोगस व्होटर आयडीच आढळून आले आहेत. ठाकरेंच्या शिवसेनेचे पदाधिकारी योगेश गांगुर्डेनी हा पदार्फाश केला. एकाच नावाने 3 बनावट मतदान कार्ड पाहायला मिळत आहेत. सुनील रवींद्र वाजपेयी या मतदाराचे तीन वेगवेगळे कार्ड आहेत. पण वडिलांचं आडनाव मात्र चौधरी असं आहे. विवेक मुन्डले आणि योगेश काळुंगे ही नावं वेगळी आहेत, पण फोटो मात्र एकच आहे. विहंग परब याच्या वडिलांचं आडनाव वैद्य झालंय. आणि मिना कळमकर या महिला मतदाराच्या आयडीवर चक्क पुरूषाचा फोटो पाहायला मिळतोय.

एकंदरीतच राहुल गांधींनी दिल्लीत पत्रकार परिषद घेत, महाराष्ट्र आणि कर्नाटकात मतचोरी झाल्याचे आरोप केले होते. त्यानंतर मतदार यादीतील घोळांची मालिकाच सुरू झालीय. घोळांची ही मालिका विरोधकांच्या आरोपांना बळ देणारी आहे. त्यामुळे निवडणूक आयोगानं या सर्व प्रकारावर खुलासा करण्याची गरज आहे.

# सरन्यायाधीश गवईंनी टोल वसुलीवरून...

केली जाऊ शकते, असे कोर्टाने मागील आठवड्यातही फटकारले होते. एनएचएआयच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी रस्त्यावर ट्रक पलटी झाल्याने वाहतूककोंडी झाल्याचे कोर्टात सांगितले.

त्यावर न्यायमूर्ती चंद्रन यांनी ट्रक आपोआप पलटी झाला नाही तर रस्त्यांवरील खड्डयांमुळे पडल्याचे निदर्शनास आणून दिले. त्यानंतर सरन्यायाधीश गवई यांनी 65 किलोमीटरच्या रस्त्यासाठी किती टोल घेतला जातो, अशी विचारणा केली. त्यावर 150 रुपये द्यावे लागत असल्याचे सांगण्यात आल्यानंतर सरन्यायाधीश म्हणाले, रस्त्याच्या एका टोकावरून दुसऱ्या टोकाला जाण्यासाठी 12 तास लागत असतील तर 150 रुपये का द्यावेत? ज्या रस्त्यासाठी एक तास अपेक्षित आहे, तिथे 11 तास लागतात आणि त्यासाठी टोलही द्यायचा.

सुनावणीदरम्यान एका वकीलांनी म्हटले की, 'सुप्रीम कोर्टाच्या गेट ई समोर नेहमी वाहतूक कोंडी असते. लोक एक तास उशिरा येतात. मी वकिलांना पळताना पाहिले आहे.' त्यावर सरन्यायाधीश गवई यांनी टिप्पणी केली की, दिल्लीत जर दोन तास पाऊस पडला तर संपूर्ण शहर लकवाग्रस्त होते. समुद्रालगच्या भागात तर मान्सूनमुळे खूप अडचणी येतात. आम्ही प्रत्येक बाबींचा विचार करू. आता निकाल राखून ठेवत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः अॅड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# कुर्डूवाडी बस स्थानक परिसरात गटारीचे पाणी साचल्याने प्रवाशांची गैरसोय



**कुर्डूवाडी (कटूसत्य वृत्त):-** येथील बस स्थानक परिसरात गटारीचे आणि पावसाचे पाणी साचल्यामुळे प्रवाशांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.याबाबत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे करमाळा-माढा विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष आकाश (भाऊ) लांडे यांनी कुडूर्वाडी नगरपरिषदेच्या भोंगळ कारभारावर तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली आहे.

आकाश लांडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, कुर्डूवाडी बस स्थानकात ये-जा करणाऱ्या प्रवाशांना गटारीच्या घाण पाण्यातून वाट काढावी लागत आहे. ही बाब अत्यंत गंभीर आहे. या संदर्भात कुडूर्वाडी आगाराचे प्रमुख मा.प्रसाद लाड यांनी अनेकदा नगरपरिषदेकडे तक्रार केली आहे. त्यांनी ३ जुलैपासून सातत्याने पाठपुरावा करूनही नगरपरिषदेने याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे.

ही जागा बस स्थानकाच्या हद्दीत येत नसून ती नगरपरिषदेच्या हद्दीत असल्यामुळे ही जबाबदारी नगरपरिषदेची असल्याचे आगार प्रमुख लाड यांनी स्पष्ट केले आहे. नगरपरिषदेच्या या दुर्लक्षामुळे प्रवाशांच्या आरोग्याला मोठा धोका निर्माण झाला असून, पावसाळ्याच्या दिवसांत रोगराई पसरण्याची शक्यताही वाढली आहे.

या प्रकरणी नगरपरिषदेने तातडीने लक्ष घालून प्रवाशांची गैरसोय दूर करावी, अशी मागणी आकाश (भाऊ) लांडे यांनी केली आहे. या समस्येवर त्वरित तोडगा न काढल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

# १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शेळगी येथील श्री सदगुरु प्रभाकर महाराज सार्वजनिक वाचनालय येथे १५ ऑगस्ट २०२५, भारताचा ७९ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला मा.महादेव पाटील, माजी सभापती, परिवहन महामंडळ - यांच्या हस्ते ध्वजवंदनाचा कार्यक्रम करण्यात आला. ध्वजवंदनास प्रमुख पाहुणे म्हणून, जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष बाबुराव नरुणे, उपाध्यक्ष अशोक खानापुरे सर, सचिव मनमथ कोनापुरे, सहसचिव शिवलिंग आप्पा शहाबादे, भीमराव गंगधरे, सुरेश तानवडे, राजशेखर पाटील, शेळगी जिल्हा परिषद शाळा मुख्याध्यापीका सुनंदा अंकुश काळे, आशा सोमदळे मॅडम, संतोष जाधव सर, ईश्वरी गौरी, आरती स्वामी, रूपेश हिप्पर्गे शालेय विद्यार्थी, महिला वाचक श्रीमती. गंगाबाई निन्ने, शशिकला वांगीकर, धानय्या स्वामी,गौरी वांगीकर, रूपाली सट्टे, व बाल वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हा परिषद शाळा शिक्षिका मंजूषा रोकडे मॅडम यांनी घरातील जेष्ठ व्यक्तींना सनमाननीय वागणूक देण्या संबंधी सर्व बालवाचक यांच्याकडून शपथ घेतली. कार्यक्रमाचे सूत्र संचालन संगीता आराध्ये यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रंथपाल नंदा कुर्ले, समर्थ कुर्ले यांनी प्रयत्न केले.कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांचे आभार वाचनालयाचे कार्यवाह जयंत आराध्ये यांनी मानले.

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

**-: संपर्क :-**

**8083608083**
**9922646566**
**8698732109**

(सरकार मान्य)

**अथर्व पेस्ट कंट्रोल**

An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
**झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण**

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

**माढेश्वरी अर्बन मल्टीपल निधी लिमिटेड**
**रेजिस्टर ऑफिस: 3470 तेलगिरणी चौक बार्शी सोलापूर** MH ४१३४११
Email ID- madheshnidhi555@gmail.com CIN: U65990PN2018PLC180988

**७वी वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना**

कंपनी कायदा, २०१३ च्या कलम २ (२०) आणि ९१ नुसार आणि कंपनी नियम, २०१४ आणि इतर लागू कायद्यांनुसार सर्व भागधारकांना याद्वारे सूचना देण्यात आली आहे, कंपनी ची वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार, १५ सप्टेंबर, २०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता नोंदणीकृत कार्यालय 3470 तेलगिरणी चौक बार्शी सोलापूर MH ४१३४११ येथे आयोजित केली आहे. त्या मध्ये खालील व्यवहार केले जातील:-

सामान्य विषय

a) ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षासाठी लेखापरीक्षित वित्तीय विवरणे प्राप्त करणे, संचालकांचा अहवाल आणि त्यावरील लेखापरीक्षकांचा अहवाल विचारात घेणे आणि स्वीकारणे,

b) खालील ठराव एक सामान्य ठराव म्हणून विचारात घेणे आणि योग्य वाटल्यास, बदलांसह किंवा त्या शिवाय पास करणे, ''निर्धारित केले, श्री. सुधीर नागनाथ मोरे [DIN:08312541] संचालक, जे रोटेशनद्वारे सेवा निवृत्त होत आहेत आणि पात्र असल्याने ते स्वतः पुनर्नियुक्ती चा प्रस्ताव देत आहे, त्यांची कंपनीचे संचालक म्हणून पुनर्नियुक्ती केली जाईल, जे रोटेशन व्दारे निवृत्त होण्यास जबाबदार असतील.''

उपरोक्त कलमाचे पालन करून, ज्या भाग धारकांचे शेअर होल्डिंगरु. १०००/- पेक्षा जास्त आहे, त्यांना वार्षिक अहवालाची प्रत्यक्ष प्रत देण्यात येईल, इतर भागधारकांसाठी कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात ती मिळवू शकेल. कंपनी सर्व भागधारकांना विनंती करते की ज्यांनी अद्याप कंपनीकडे त्यांचा ई मेलआयडी नोंदणीकृत / अपडेट केलेला नाही त्यांनाही सार्वजनिक सूचना प्रकाशित झाल्यापासून ३ दिवसांच्या आत नोंदणी करावी.

सर्वसभासद/भागधारकांनी सभेला उपस्थित राहावे, ही विनंती. कंपनीच्या वार्षिक अहवालाची प्रत कंपनीच्या नोटिसबोर्डवर सर्व लावण्यात आली आहे आणि कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात तपासणी केली जाऊ शकते, भागधारकांना वैयक्तिकरित्या किंवा प्रॉक्सीद्वारे मतदान करण्याचा अधिकार आहे.

सभासद/ भागधारकांनी या प्रकरणातील कोणतीही शंका/तक्रारी madheshnidhi555@gmail.com ई-मेल आयडीवर पाठवावी.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
माढेश्वरी अर्बन मल्टीपल निधी लिमिटेड
श्री.अशोक दगडूलाल लुणावत
अध्यक्ष (DIN:08312540)

ठिकाण: बार्शी
तारीख: १९/०८/२०२५

**माढेश्वरी अर्बन मल्टी पर्पज निधी लिमिटेड**
**रेजिस्टर ऑफिस: C/o** R-847/9 (C-3) **भोरीलाल तेजराज शर्मा मु.कुर्डवाडी तालुका माढा जि.सोलापूर** MH ४१३२०८
Email ID- sudhirmore599@gmail.com CIN: U65991PN2021PLN202245

**4th वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना**

कंपनी कायदा, २०१३ च्या कलम २ (२०) आणि ९१ नुसार आणि कंपनी नियम, २०१४ आणि इतर लागू कायद्यांनुसार सर्व भागधारकांना याद्वारे सूचना देण्यात आली आहे, कंपनी ची वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार, १५ सप्टेंबर, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता नोंदणीकृत कार्यालय C/o भोरीलाल तेजराज शर्मा कुर्डुवाडी तालुका माढा R-847/9 (C-3) कुर्डुवाडी, कुर्डुवाडी सोलापूर MH ४१३२०८ IN येथे आयोजित केली आहे. त्या मध्ये खालील व्यवहार केले जातील:-

सामान्य विषय

a) ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षासाठी लेखापरीक्षित वित्तीय विवरणे प्राप्त करणे, संचालकांचा अहवाल आणि त्यावरील लेखापरीक्षकांचा अहवाल विचारात घेणे आणि स्वीकारणे,

b) खालील ठराव एक सामान्य ठराव म्हणून विचारात घेणे आणि योग्य वाटल्यास, बदलांसह किंवा त्या शिवाय पास करणे, ''निर्धारित केले, श्री अभिजित अशोक लुणावत [DIN:08076922] संचालक, जे रोटेशनद्वारे सेवानिवृत्त होत आहेत आणि पात्र असल्याने स्वतः पुनर्नियुक्ती चा प्रस्ताव देत आहे, त्यांची कंपनीचे संचालक म्हणून पुनर्नियुक्ती केली जाईल, जे रोटेशन व्दारे निवृत्त होण्यास जबाबदार असतील.

उपरोक्त कलमाचे पालन करून, ज्या भागधारकांचे शेअरहोल्डिंग रु. १०००/- पेक्षा जास्त आहे, त्यांना वार्षिक अहवालाची प्रत्यक्ष प्रत देण्यात येईल, इतर भागधारकांसाठी कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात ती मिळवू शकेल. कंपनी सर्व भागधारकांना विनंती करते की ज्यांनी अद्याप कंपनीकडे त्यांचा ईमेल आयडी नोंदणीकृत/अपडेट केलेला नाही त्यांनाही सार्वजनिक सूचना प्रकाशित झाल्यापासून ३ दिवसांच्या आत नोंदणी करावी.

सर्व सभासद / भागधारकांनी सभेला उपस्थित राहावे, ही विनंती. कंपनीच्या वार्षिक अहवालाची प्रत कंपनीच्या नोटिस बोर्ड वर सर्व लावण्यात आली आहे आणि कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात तपासणी केली जाऊ शकते, भागधारकांना वैयक्तिकरित्या किंवा प्रॉक्सी द्वारे मतदान करण्याचा अधिकार आहे.

सभासद/भागधारकांनी या प्रकरणातील कोणतीही शंका/तक्रारी sudhirmore599@gmail.com ई-मेल आयडीवर पाठवावी.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
माढेश्वरी अर्बन मल्टी पर्पज निधी लिमिटेड
श्री. अशोक दगडूलाल लुणावत
अध्यक्ष (DIN:८३१२५४० )

ठिकाण: कुर्डुवाडी जिल्हा. सोलापूर
तारीख: १९/०८/२०२५

**MADHESWARI URBAN MULTIPLE NIDHI LIMITED**
**Regd. off: 3470 Telgirnee Chowk Barshi Solapur MH 413411**
Email ID- madheshnidhi555@gmail.com CIN: U65990PN2018PLC180988

**NOTICE OF THE 7th ANNUAL GENERAL MEETING**

Notice is hereby given to all Shareholders in pursuant to Section 2 (20) and 91 of the Companies Act, 2013 and read with Companies Rules, 2014 and other applicable law the Company would be conducting AGM on Monday, 15th September, 2025 at 12.00 noon .at 3470 Telgirnee Chowk Barshi Solapur 413411 on Physically with the transact the business as below:-

ORDINARY BUSINESS:

a) To receive, consider and adopt the Audited Financial Statements for the year ended 31" March 2025, together with the Director's Report and the Auditor's Report thereon.

b) To consider and if thought fit, to pass with or without modification, the following Resolution as an Ordinary Resolution:

"RESOLVED THAT Mr Sudhir Nagnath More [DIN: 08312541], Director, who retires by rotation and being eligible offers himself for reappointment, be and is hereby reappointed as the Director of the Company, liable to retire by rotation."

In Compliance with aforementioned section, electronic Copies of the Notice of the AGM and Annual Report 2024-2025 have been sent to the Members whose Email ID are available and registered with Company. The members who do not receive Notice can get the same at the registered office of the Company. The Company requests all the shareholders who have not yet registered /updated their email id with Company to register the same within 3 days from publication of this public notice.

All the members/shareholders are requested to attend the Meeting. The Annual report of the Company can be inspected at the registered office of the Company and Financial Statement with enclosures are affixed in the Notice Board of the Company and Shareholders are entitled to vote either in person or through proxy. Any Query/grievances in this matter may be addressed at E-mail ID madheshnidhi555@gmail.com.

By order of the Board
For Madheswari Urban Multiple Nidhi Limited
Mr. Ashok Dagadulal Lunawat
Chairman (DIN: 08312540)

Place: Barshi
Date: 19/08/2025

**MADHESWARI URBAN MULTIPURPOSE NIDHI LIMITED**
**Regd. off: C/O Bhorilal Tejaraj Sharma Kurudwadi Taluka Madha R-847/9 (C-3) Kurudwadi, Solapur, Kurudwadi, Maharashtra, India, 413208**
Email ID- sudhirmore599@gmail.com CIN: U65991PN2021PLN202245

**NOTICE OF THE 4th ANNUAL GENERAL MEETING**

Notice is hereby given to all Shareholders in pursuant to Section 2 (20) and 91 of the Companies Act, 2013 and read with Companies Rules, 2014 and other applicable law the Company would be conducting AGM on Monday, 15th September, 2025 at 11.00 A.M.at C/O Bhorilal Tejaraj Sharma Kurudwadi Taluka Madha R-847/9 (C-3) Kurudwadi Solapur 413208 on Physically with the transact the business as below :-

ORDINARY BUSINESS:

a) To receive, consider and adopt the Audited Financial Statements for the year ended 31 March 2025, together with the Director's Report and the Auditor's Report thereon.

b) To consider and if thought fit, to pass with or without modification, the following Resolution as an Ordinary Resolution:

"RESOLVED THAT Mr Abhijit Ashok Lunawat [DIN: 08076922], Director, who retires by rotation and being eligible offers himself for reappointment, be and is hereby reappointed as the Director of the Company, liable to retire by rotation."

In Compliance with aforementioned section, electronic Copies of the Notice of the AGM and Annual Report 2024-2025 have been sent to the Members whose Email ID is available and registered with Company. The members who do not receive Notice can get the same at the registered office of the Company. The Company requests all the shareholders who have not yet registered /updated their email id with Company to register the same within 3 days from publication of this public notice.

All the members/shareholders are requested to attend the Meeting. The Annual report of the Company can be inspected at the registered office of the Company and Financial Statement with enclosures are affixed in the Notice Board of the Company and Shareholders are entitled to vote either in person or through proxy. Any Query/ grievances in this matter may be sudhirmore599@gmail.com

By order of the Board
For Madheswari Urban Multipurpose Nidhi Limited
Mr. Ashok Dagadulal Lunawat
Chairman (DIN: 08312540)

Place: Kurudwadi
Date: 19/08/2025

# फिनिक्स इंग्लिश स्कूलमध्ये ७९ वा स्वातंत्र्याचा महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा




**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** फिनिक्स इंग्लिश स्कूलचा परिसर आज सकाळी देशभक्तीच्या रंगांनी उजळून निघाला.पहाटेपासूनच विद्यार्थ्यांमध्ये,शिक्षकांमध्ये आणि पालकांमध्ये उत्साहाची लहर होती.भारतीय सैन्य दलातील नॉन कमिशन ऑफिसर विकास जगदाळे यांच्या हस्ते अभिमानाने तिरंगा फडकवण्यात आला,त्यांचे राष्ट्रसेवेतील हे १४ वे वर्ष आहे,त्यांचे अद्वितीय योगदान शौर्य,सेवाभाव पाहता उपस्थित पालक व विद्यार्थी यांनी त्यांचे उभे राहून स्वागत केले.

जवान विकास जगदाळे यांचा पराक्रम हा पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल असा गौरवपूर्ण उल्लेख मुख्यध्यापिका नूरजहाँ शेख यांनी केला.ध्वजारोहन होताच राष्ट्रगीताने वातावरण भारून गेले.माजी सैनिक मनोहर भोळे, वीरपत्नी सोनाली सौरभ फराडे, रेश्मा विकास जगदाळे यांच्या उपस्थितीत शाळेचे वातावरण उत्साहमय व देशभक्तीपूर्ण झाले.

विद्यार्थ्यांच्या सुरेल आवाजातली देशभक्तीपर गाणी, नृत्यावरील दमदार ताल आणि चिमुकल्या विद्यार्थ्यांची भाषणे पाहून उपस्थितांनी टाळ्यांचा वर्षाव केला. देशासाठी हसत-हसत बलिदान देणाऱ्या वीरांना अभिवादन करण्यात आले. शाळेच्या संस्थापक अध्यक्षा नूरजहाँ शेख यांनी "देशप्रेम हे फक्त भावना नाही,ती कृती असते" असा संदेश दिला. शेवटी 'भारत माता की जय' च्या घोषणांनी आकाश दणाणून गेले आणि तिरंग्याखाली एकत्र आलेल्या सर्वांच्या मनात अभिमानाची ज्योत पेटली.याप्रसंगी ॲड.प्रदीप कदम, अभिजित जाधव सर, फिनिक्स स्कूल पालक संघाचे अध्यक्ष महादेव कोळेकर उपाध्यक्ष निलेश वाघ, महिला पालक संघ अध्यक्षा निशा ननवरे, उपाध्यक्षा निकिता मोरे, गुलशन शेख, तमन्ना शेख व पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला. खाऊ वाटप केलेल्या पालकांचे व उपस्थितांचे आभार गुलशन शेख यांनी मानले.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) हिंदी सिनेसृष्टीतील महानायक अभिनेता २) नदीचा काठ, बाण ३) अंतराळात प्रवास करणारे वाहन, नया उलट लिहा ४) उजेड ५) साठ मिनिटांचा एक ** ६) वायू, वारा ७) दुप्पट (इंग्रजीत) ११) नोकरच्या विरूध्दार्थी, धनी १२) गन उलट लिहा १३) कर्मचाऱ्यांना मिळणारा पगार १५) एक (इंग्रजीत) १७) फोटो (हिंदीत) २१) दहा (हिंदीत) २२) श्रीरामाचा एक बंधू २३) उद्या (हिंदीत) २४) ढग (हिंदीत) २५) दशमी नंतरचा दिवस २६) दहा (इंग्रजीत) २८) थकीत येणे राहिलेली रक्कम ३०) घोड्याच्या पायाच्या खुराला ठोकतात ती अर्धवर्तुळाकार पट्टी ३३) आदर सत्कार, ** सन्मान ३४) पुण्यातील प्रसिध्द गणपती-***** हलवाई ३५) वाईट सवय ३६) आठवड्यातील एक वार ३७) मालावर भरावा लागणारा कर, टॅक्स ३८) दुधावरील मलई ४०) लहान बाळाला टोचतात ती ४२) दशरथपुत्र ४४) दात ४५) तीन दुणे ४७) शरीर (हिंदीत), दक उलट लिहा ४८) सायकलच्या चाकाच्या या भागावर टायर बसवितात

**आडवे शब्द :** १) गुढीपाडव्यानंतरचा एक सण
४) भवानीमातेचे मंदिर छ. शिवरायांनी या किल्ल्यावर बांधले आहे
८) क्रिकेटमधील धाव (इंग्रजीत) ९) सशाशी शर्यत लावणारा कथेतील प्राणी
१०) हवामानातील उष्मा १३) पोशाख, एक म्हण-जसा देश तसा **
१४) आश्चर्य १६) नजीक, समीप १८) मोफत (इंग्रजीत)
१९) पाण्यावर तरंगणारा एक पक्षी २०) घर, निवास २४) अकरा दुणे
२५) मोबाईल फोनची सेवा पुरविणारी आयडिया प्रमाणे एक कंपनी
२७) स्त्रियांचा नाकातील दागिना २९) वस्तूचे मूल्य, भाव
३०) अनेक रस्ते एकत्र येतात असे मोक्याचे ठिकाण ३१) शरीर, काया
३२) किमानच्या विरूध्दार्थी
३४) पाणीयुक्त चिखल, गाळ ३७) जीभ (हिंदीत) ३८) घर वा फर्निचरकरता या वृक्षाचे लाकूड वापरतात ३९) थंड, गार, मुलीचे एक नाव ४१) काकाची बायको
४२) एक माजी भारतीय फलंदाज-अंबाती *** ४३) वाकडातिकडा नसलेला, स्ट्रेट
४५) मस उलट लिहा ४६) शेकाप पक्षाचे पूर्ण नाव-**** कामगार पक्ष
४९) औषध (हिंदीत) ५०) पाच दुणे ५१) बारा गुणिले पाच
५२) गुजरात जवळील केंद्रशासित प्रदेश-दिव ***

**सुडोकु - 31**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 5 | 9 | | | 3 | 7 |
| | 7 | 9 | | 3 | 2 | | 8 | |
| | | 8 | 7 | | | | | |
| 3 | | | | | 1 | 6 | 2 | |
| | 9 | | | | 6 | 3 | 7 | |
| 7 | 2 | | 3 | | | 1 | 5 | 8 |
| | | | | | 7 | 8 | 6 | 5 |
| | 8 | 7 | | 1 | | 2 | 4 | |
| | 5 | 4 | 6 | | | 7 | | |

# लोकमंगलचा सर्वधर्मिय सामुदायिक विवाह सोहळा 16 नोव्हेंबर रोजी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** लोकसेवेसाठी सामाजिक उपक्रम राबविता यावेत यासाठी सुरु केलेली चळवळ म्हणजे लोकमंगल फाऊंडेशन होय. सेवा कार्याच्या माध्यमातून लोकमंगल फाऊंडेशन समाजाच्या अनेक क्षेत्राते पोहोचले आहे. जसे की, अन्नपूर्णा योजने माध्यमातून गरजू, निराधार, वयोवृद्ध जेष्ठ नागरिकांना १५ लाखापेक्षा जास्त डब्बे मोफत देण्यात आले आहेत. शैक्षणिक मदतीसाठी लोटस योजनेच्या माध्यमातून गुणवंत, गरीब, गरजू विद्यार्थ्यांना दत्तक घेऊन ८५ लाखापर्यंतची शिष्यवृत्ती देण्यात आली आहे. यंदा १०० पेक्षा जास्त शाळामधून गरजू, एकल पालकांच्या विद्यार्थ्यांना १ लाख वह्यांचे वाटप करण्यात आले आहे. तसेच धार्मिक, सांकृतिक प्रचार, प्रसिद्धीसाठी भजन- भारुड स्पधाचे आयोजन, भजनी मंडळांना साहित्य वाटप देखील करण्यात येते. या बरोबरच आरोग्य विषयक सेवा, दिव्यांगासाठी साहित्य, शेतकरी वृद्ध सेवा, जलसंधारण, समृद्धग्राम योजना, एकलपालक महिलांचे सक्षमीकरण, विविध शैक्षणिक, साहित्यिक क्षेत्रातील पुरस्कार, विद्यार्थासाठी किल्ला बांधणी स्पर्धा अशा अनेक योजनेच्या माध्यमातून मदत करत हा वटवृक्ष गरजवंतांना सावली देत आहे. समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत सेवा पोहोचविणे हे आपले आद्य कर्तव्य मानून




फाऊंडेशन काम करीत आहे. सामाजिक उपक्रमाचा एक भाग म्हणून दरवर्षी होणारा लोकमंगल फाऊंडेशनच्या वतीने आयोजित सर्वधर्मिय सामुदायिक विवाह सोहळा यंदा रविवार, १६ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ०५ वाजून ०८ मिनिटांनी गोरज मुहूर्तावर नेहरू नगर, विजयपूर रोड, सोलापूर येथील शिवाजी अध्यापक विद्यालयाच्या प्रांगणात संपन्न होणार आहे. लोकमंगल फाऊंडेशन तर्फे विवाह सोहळ्याचे २० वे वर्ष असून ४६ वा सामुदायिक विवाह सोहळा आहे, अशी माहिती लोकमंगल फाऊंडेशन संस्थापक अध्यक्ष तथा आमदार सुभाष देशमुख यांनी दिली.

विवाह सोहळ्यासाठी सोलापूर शहरासह जिल्ह्यामध्ये लोकमंगल बँक, लोकमंगल नागरी पतसंस्था, लोकमंगल मल्टीस्टेट, आदी एकूण १०० पेक्षा पेक्षा जास्त माहिती केंद्राची व्यवस्था करण्यात आली असून विवाह सोहळ्यासाठी नाव नोंदणी सोमवार दि. १० नोव्हेंबर अंतिम तारीख असणार आहे. या विवाह सोहळयामध्ये जास्तीत जास्त विवाह इच्छुकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन लोकमंगल फाऊंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी विकास नगर येथील लोकमंगल फाऊंडेशन ऑफिस येथे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ७७२००९६४८८, ०२१७-२६०६०७०.

या विवाह सोहळ्यात प्रत्येक वधू-वरास विवाहाचे कपडे, हळदीचे कपडे, वरास बूट, वधूस चप्पल, मानाचा आहेर, स्वतंत्र मेकअप करण्याची व्यवस्था, वधूस मणी मंगळसूत्र व जोडवे देण्यात येणार आहेत. ताट, वाटी, ग्लास प्रत्येकी ५ नग, स्टील हंडा, स्टील डबा, तांब्या आदी संसारोपयोगी साहित्य देण्यात येणार आहे. ५० हजार व्हाडी मंडळीच्या भोजनाची सोय केली असून वधू वरासोबत येणाऱ्या व्हाडी मंडळी संख्येवर बंधन असणार नाहीत. वधू वरास वैवाहिक जीवन सुखी होण्यासाठी समुपदेशन देखील केले जाते. वधू-वरांची सोलापूर शहरातील प्रमुख मार्गाने मिरवणूकही काढण्यात येणार आहे. याशिवाय प्रत्येकाच्या धर्माप्रमाणे विवाह लावून दिले जाणार आहेत, असे आमदार देशमुख म्हणाले.

आतापर्यंत ३१५३ जोडपी विवाहबद्ध फाऊंडेशन तर्फे यंदाचा होणारा ४६ वा सामुदायिक विवाह सोहळा आहे. आतापर्यंत ३१५३ जोडपी विवाहबद्ध झाली आहेत. यामध्ये हिंदू २४४३, बौद्ध ६७८, मुस्लिम २१, जैन ७ तर ख्रिश्चन समाजाचे ४ विवाह झाले आहेत.

जोडप्यांच्या मुलांनाही फाऊंडेशनतर्फे मदत

लोकमंगल फाऊंडेशनच्या सामुदायिक विवाह सोहळ्यात विवाहबद्ध झालेल्या जोडप्यांच्या मुलांनाही फाऊंडेशन तर्फे मदत केली जाते, त्यांना लोटस योजनेद्वारे शिक्षणासाठी आर्थिक मदत देण्याची योजना फाऊंडेशन मार्फत राबवली जाते. याचा अनेकांनी लाभही घेतला आहे तसेच विवाह झालेल्या जोडप्यांना व्यवसायासाठी, रोजगारासाठी देखील मदत केली जाते.

लोकमंगल फाऊंडेशनच्या माध्यमातून जिल्ह्यातील कुठल्याही गावात ५ पेक्षा जास्त जोडप्यांचे लग्न जमले असल्यास त्याच गावात विवाह सोहळ्याचे आयोजन देखील करण्यात येत असते. भविष्यात दिव्यांगासाठी देखील नोंदणी आल्यास वेगळा विवाह सोहळा भरवण्याचा मानस आमदार सुभाष देशमुख यांनी व्यक्त केला.

# वाखरी येथे कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक यांचे पाचवे पुण्यस्मरण

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** वाखरी (ता. पंढरपूर) येथे पांडुरंग परिवाराच्या वतीने कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक यांचे पाचवे पुण्यस्मरण श्रद्धाभावाने व विविध सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरे करण्यात आले. दिवसभर धार्मिक, सामाजिक कार्यक्रमांमधून सुधाकरपंतांच्या कायार्चा गौरव करण्यात आला. सकाळी भव्य रक्तदान शिबिराने पुण्यस्मरण कार्यक्रमाची सुरुवात झाली. यामध्ये शेतकरी,कामगार व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. यात तब्बल २६७ जणांनी रक्तदान करून सुधाकरपंतांच्या समाजसेवेच्या परंपरेला सलाम अर्पण केला.

यानंतर ह.भ.प. जयवंत बोधले महाराज यांनी कीर्तनातून सुधाकरपंतांच्या जीवनकायार्चा



आढावा घेतला. त्यांच्या समाजप्रेम, लोकाभिमुख कार्यपद्धती आणि कर्मयोगी वृत्तीचे प्रभावी वर्णन करून उपस्थितांना प्रेरणादायी संदेश दिला. दुपारी पांडुरंग परिवाराने पुष्पांजली अर्पण करून सुधाकरपंतांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. दिवसभर परिसरातील नागरिक, शेतकरी विविध राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून सुधाकरपंतांना अभिवादन केले. श्रद्धांजली वाहण्यासाठी आलेल्या प्रत्येकाच्या मनात त्यांच्या कार्याबद्दल अपार आदर दिसून आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पांडुरंग चे चेअरमन प्रशांत परिचारक, युटोपियन शुगरचे उमेश परिचारक, व्हा. चेअरमन कैलास खुळे, कार्यकारी संचालक डॉ.यशवंत कुलकर्णी व संचालक मंडळ, अधिकारी यांनी परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाला अर्बन बँकेचे चेअरमन सतीश मुळे, मार्केट कमिटीचे चेअरमन हरीश दादा गायकवाड, व्हाईस चेअरमन राजू बापू गावडे, विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समिती सदस्य जळगावकर, पंचायत समिती सभापती जयश्री व्हरगर, संत दामाजी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन शिवानंद पाटील, धनश्री परिवार प्रमुख शिवाजीराव काळुंखे, बी.पी. रोंगे, पंढरपूर-मंगळवेढ्यातील मान्यवर, पांडुरंग कारखान्याचे संचालक, मार्केट कमिटीचे संचालक, जिल्हा परिषद सदस्य, नगरपालिकेचे सदस्य, ज्येष्ठ संचालक दिनकरराव मोरे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.सामाजिक बांधिलकी, धार्मिक श्रद्धा आणि कार्यपरंपरेचा संगम घडवून हा पुण्यस्मरण सोहळा यशस्वीरीत्या पार पडला.

## गोकुळअष्टमीच्या निमित्ताने ऑर्किड मध्ये रंगला दहीहंडी सोहळा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरातील नागेश करजगी ऑर्किड स्कूल मध्ये श्रीकृष्ण जन्मोत्सवाच्या निमित्ताने दहीहंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे अध्यक्ष डॉ.कुमार दादा करजगी यांच्या हस्ते पाळणा पूजन करून करण्यात आले. यावेळी संस्थेच्या सचिवा वषार्ताई विभूते, यशराज करजगी, स्कूलचे व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, प्राचार्या रुपाली हजारे, स्कूलच्या मार्गदर्शिका मीना



पारखे, आदि मान्यवर उपस्थित होते. शाळेच्या प्रांगणात विद्यार्थी बाल श्रीकृष्णाच्या व राधाच्या वेशभूषा करून आले होते. या निरागस बालचमूमुळे शाळेच्या परिसरास गोकुळाचे रूप प्राप्त झाले होते. यावेळी विद्याथ्यार्नी भगवान श्रीकृष्णाच्या जीवनावर आधारित नृत्य सादर करून उपस्थितांची वाहवा मिळविली.शाळेच्या प्रांगणात दही दुधाने भरलेली दहीहंडी विद्यार्थ्यांनी गोविंदा रे गोपाळा,यशोदेच्या तान्ह्या बाळा या गाण्यावर थिरकत थिरकत मानवी मनोरे रचत दहीहंडी फोडली.याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉ.कुमार दादा करजगी यांनी विद्यार्थ्यांना कृष्ण जन्माष्टमीच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन दिसी निंबर्गीकर यांनी केले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# यंदा ४० टक्के ऊस हार्वेस्टरच्या माध्यमातून तोडण्याचे नियोजन

**मोहोळ(कटूसत्य वृत्त):-** यंदाच्या गळीत हंगामापासून लोकनेते कारखाना चाळीस टक्के ऊस हा यांत्रिक मशिनरीच्या साह्याने तोडणार असून कारखान्याने गव्हाण मशिनरी अद्यावत करण्याबरोबर दोन

ट्रिप्लर देखील बसवले आहेत. यंदाच्या वर्षी चाळीस टक्के ऊस यांत्रिक म्हणजे हार्वेस्टर मशीनने आणण्याचा प्रयोग यशस्वी झाल्यास पुढच्या वर्षी तो पन्नास टक्क्यावर नेण्यात येईल. या प्रयोगाचा सर्वाधिक फायदा ऊस उत्पादकांना होणारा असून यामुळे ऊस वेळेत कारखान्यास येऊन उत्पादकांना

मोठा दिलासा मिळणार आहे, अशी माहिती लोकनेते शुगरचे चेअरमन बाळराजे पाटील यांनी 'पुण्यनगरी'शी बोलताना दिली.



बाळराजे म्हणाले की, ऊस तोडणी कामगारांच्या समस्येबाबत राज्यातील काही कारखान्यांना भेटी देऊन १०० टक्के हार्वेस्टरवरच चालणाऱ्या कारखान्यांच्या कार्यपद्धतीचा आम्ही अभ्यास केला. त्यामधील लातूर जिल्ह्यातील मांजरा कारखान्याचा प्रामुख्याने समावेश आहे. साखर कारखाना क्षेत्रात दिवसेंदिवस ऊस तोडणी कामगारांचा प्रश्न जटिल बनत आहे. टोळ्यांकडून होणारी फसवणूक त्याचबरोबर मुकादमांकडून ऊस वाहतूकदारांची पिळवणूक या बाबी राज्यभर निदर्शनास येत आहेत. ऊस तोडणी कामगार अपेक्षित प्रमाणात आणि वेळेत न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांचा ऊस पक्वहोऊनही वेळेत कारखान्यास आणण्यासाठी मयार्दा पडत होत्या. त्यामुळे लोकनेते कारखान्याने यंदाच्या वर्षी चौदा सुशिक्षित युवकांना प्रत्येकी तीस लाख रुपयाची बिनव्याजी रक्कम देऊन त्यामधून ऊस तोडणी मशीन खरेदीसाठी प्रोत्साहन दिले आहे. हा एक अभिनव प्रयोग केल्याचे पाटील यांनी सांगितले. यावेळी कारखान्याचे कार्यकारी संचालक ओमप्रकाश जोगदे यांच्यासह संचालक मंडळ उपस्थित होते.

# शेळगांव व वाणेवाडी मधील विद्यार्थी रस्ता दुरूस्तीच्या मागणीसाठी तिरंगा घेऊन उतरले रस्त्यावर..

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** बार्शी तालुक्यातील शेळगाव हे मराठवाडा हद्दी लगतचे सिमावर्तीय भागातील गांव आहे.या गावातून मराठवाड्यातील तुळजापूर,काटी, सावंतवाडी व वाणेवाडी आदी महत्त्वाच्या गावाला जाणारा रस्ता आहे.हा रस्ता पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा या विभागाला जोडला जाणारा अत्यंत महत्त्वाचा रस्ता आहे. हा रस्ता शेळगाव या गावाच्या पूर्व दक्षिण कोपयार्तून पुढे मराठवाडयाला मिळतो. शिवाय सोलापूर - बार्शी या महामागार्ला देखील तो रस्ता मिळतो . त्यामुळे या रस्त्याने शेतकरी, विद्यार्थी, व्यापारी आदींचे माध्यमातून मोठी दळणवळण सुरू असते.हा रस्ता गेली २५ ते ३० वर्षा पासून वहातुकीस योग्य नाही. रस्त्यावर पुल नसल्याने रस्ता अतिवृष्टीचे काळात पाण्याखाली जातो, रस्त्याचे कडेला काटेरी झाडा झुडपानी वेढा घातला आहे त्यामुळे रस्ता दिसत नाही, चिखल होत असलेने दुचाकी, चारचाकी वहाने, बैलगाडी आदी वहाने जात येत नाहीत. त्यामुळे या ठिकाणी वाणेवाडी लगतच्या परंतु शेळगाव हद्दीतील बसवेश्वर नगर भाग १व २ मधील रहिवासी , शेतकरी, शेतमजूर,दुध उत्पादक, शाळकरी मुले, व्यापारी यांना प्रचंड हालअपेष्टा



सहन कराव्या लागत आहेत. सध्या शेळगाव पाझर तलाव संततधार पावसामुळे तुडुंब भरला असून त्याचा सांडवा दुतर्फा वहात आहे. यामुळे स्थानिक रहिवास्याचे प्रचंड हालहाल सुरू आहेत. शेतीची कसलीही कामे करता येत नाहीत त्यामुळे मोठे नुकसान होत आहे. शाळकरी मुलांना या अडचणीच्या रस्त्यामुळे शाळेला सक्तीने सुट्टी घ्यावी लागत आहे. दिवसेंदिवस नागरीका मध्ये असंतोष व संताप वाढत आहे. हा रस्ता दुरूस्त होऊन मिळावा म्हणून शेळगाव,वाणेवाडी मधील ग्रामपंचायत सदस्य, सरपंच,तंटा मुक्त समिती अध्यक्ष,तसेच जिल्हा परिषद शाळेचे मुख्यादयापक, शिवाय स्थानिक शेतकरी दयानंद बादगुडे, बळीराम बादगुडे, उत्तम अडसूळ, योगेश काटकर,केरबा बादगुडे,प्रविण बादगुडे व जितेंद्र मिरजे वगैरै लोकांनी प्रशासनाला अनेक लेखी निवेदने दिली आहेत. लोकशाही दिनात देखील मागणी केली होती.शिवाय मुंबई येथे मंत्रालयाच्या लोकशाही दीनात देखील याबाबत निवेदन दिले आहे. यासाठी धाराशिव चे खा.ओम राजे निंबाळकर, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या अस्मिता गायकवाड बाशीर्चे आ. दिलीप सोपल यांच्या माध्यमातून देखील पाठपुरावा सूरू आहे. परंतु प्रशासन मात्र सुस्त आहे. सिमावर्तीय भागातील रस्ता असलेने अधीकार क्षेत्राच्या कारणा वरून प्रशासन या मागणीकडे दुर्लक्ष करीत आहेत.त्यामुळे याचा उद्रेक स्थानिक रहिवासी, शेतकरी व विद्यार्थी वर्गात वाढत आहे. ७९ व्या स्वातंत्र्यदिनी लहान बालक विद्याथ्यार्नी हातात तिरंगा घेऊन सदर रस्त्यावर उतरून आपला संताप त्यांनी व्यक्त केला.यावेळी शेतकऱ्यांनी देखील पुन्हा या अनोख्या आंदोलनातून रस्ता दुरुस्तीची मागणी लावून धरली आहे.

# आ.अभिजीत पाटलांचे माढ्यातील दहीहंडी कार्यक्रमात राजकीय वक्तव्य

## अजिक्यतारा मंडळाचे १२ वर्षापासून उपक्रम



**माढा (कटूसत्य वृत्त):-** २०२४ ची माढ्याची दहीहंडी तुमच्या साथीने मला फोडता आली.आता या पुढची पण दहीहंडी आपणच तुमच्या पाठबळावर नक्कीच फोडुयात असे वक्तव्य

माढ्याचे आमदार अभिजीत पाटलांनी माढ्यातील दहीहंडी कार्यक्रमात केले. माढ्यातील अजिक्यतारा मंडळाच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज बाजार पटांगण चौकात दही हंडी उत्सव पार पडला.याचे उद्घघाटन आमदार पाटील यांच्या हस्ते पार पडले.यावेळी पाटील बोलत होते.

जिल्हा दुध संघाचे माजी संचालक राजेंद्र चवरे यांनी मागील १२ वषार्पासून दही हंडी उत्सव उपक्रम राबवत असल्याचे सांगताना विरोधकांनी या दंहीहंडी उत्सवावर टीका केली.मात्र त्यांना सण उत्सव परंपरेची कदाचित माहिती नसावी.सण उत्सवाला जर ते करमणूकीचे कार्यक्रम म्हणत असतील तर त्यांना काय बोलावे अशी टीका चवरेनी केली. यंदाची दहीहंडी फोडण्याचा मान शिवशाहीने प्रतिष्ठानने पटकावला. २१ हजारांचे पारितोषिक व चषक देऊन अध्यक्ष यश मस्के, आदित्य चव्हाण, अक्षय शिंदे, निलेश चव्हाण यांच्यासह मंडळाच्या सर्व सदस्यांचा सन्मान करण्यात आला. दहीहंडी उत्सवात शिवशाही आरमार,शिवशाही प्रतिष्ठान, वेदांत साठे मित्रपरिवार,दारफळ मित्रपरिवार यासह अन्य मंडळानी सहभाग नोंदवला.

यावेळी अभिजीत पाटील बोलताना पुढे म्हणाले, आपल्या सर्वाच्या साथीने, सर्वाच्या प्रेमाने व आशीवार्दाच्या जोरावर आपण २०२४ची विधानसभेची दहीहंडी फोडली.२०२५ ची देखील हंडी तुमच्या पाठबळावर फोडुयात असा विश्वास ठामपणे व्यक्त करताना मी माढ्याचाच आहे. मागील ३० वर्षात जेवढ्या वेळेस लोकप्रतिनिधी माढ्यात आले नाहीत. त्याहुन अधिक पटीने माढ्यात आलो. आपल्या सर्व सुज्ञ जनतेच्या पाठबळावरच विधानसभेत आवाज उठवत आहे. यावेळी संजय पाटील घाटणेकर, भारत शिंदे, झुंजार भांगे, राजेंद्र चवरे, आनंद कानडे, हनुमंत पाडूळे, ज्योती कुलकर्णी, शहाजी साठे, शंभु साठे,आबा साठे, निलेश मोरे, अरविंद खरात, शंभु चवरे, शाहु चवरे, आबा चवरे आदी उपस्थित होते.सुत्रसंचलन सुहास चवरे यांनी तर आभार शाहु चवरेनी मानले.

# गुरुवारी कुर्डूवाडी येथे पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र सोलापूर, मॉडेल करियर सेंटर, सोलापूर आणि डॉ. भारत पाटील फाउंडेशन, टेंभुर्णी, जिल्हा सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हयातील नोकरी इच्छूक उमेदवारांसाठी गुरुवार दिनांक 21 ऑगस्ट 2025 रोजी पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला असल्याचे कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी, सोलापूर यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

या रोजगार मेळाव्यात 10 वी, 12 वी, आय.टी.आय. वेल्डर, फिटर, डिप्लोमा, ग्रॅज्युएट, ऑफिस असिस्टंट, कोणतीही पदवी, इलेक्ट्रीशीय, मशिन ऑपरेटर, बी. कॉम, एम.कॉम, अशा प्रकारची एकुण 621 पेक्षा जास्त रिक्तपदे 10 उद्योजकांनी ऑनलाईन अधिसुचित केलेली आहेत.नोकरी इच्छुक उमेदवारांनी रिज्यूमच्या तीन प्रती आणि कागदपत्रासह गुरुवार, दिनांक 21 ऑगस्ट 2025 रोजी ठीक सकाळी 10 ते दुपारी 2 वाजेपर्यंत "श्री गणेश हॉल, वागळे हॉस्पिटल जवळ, माढा रोड, कुर्डूवाडी, ता. माढा जिल्हा सोलापूर येथे मुलाखतीसाठी उपस्थित रहावे.

याबाबत अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत 0217-2992956 या दूरध्वनीवर अथवा प्रत्यक्ष भेटीद्वारे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थकोट, पार्क चौक, सोलापुर येथे संपर्क साधावा, असे आवाहन हणमंत श्रीरंग नलावडे, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर यांनी केले आहे. अधिक माहितीस्तव https:// rojgar.mahaswayam.gov.ल्ल या वेबपोर्टलला भेट दयावी, असे पत्रकात नमूद आहे.

# अतिरिक्त शुल्क मागितल्यास कारवाई

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशादरम्यान विद्यार्थ्यांकडून अतिरिक्त शुल्क घेतल्याच्या तक्रारी वाढत असल्याने, राज्य सरकारने कठोर भूमिका घेतली आहे. तंत्र शिक्षण संचालनालय आणि राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने सर्व शैक्षणिक संस्थांना शुल्क नियामक प्राधिकरणाने ठरवून दिलेल्या शुल्कापेक्षा जास्त शुल्क आकारू नये, असे स्पष्ट आदेश परिपत्रात दिले आहेत.

या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही शासनाने दिला आहे. शासनाच्या योजनांचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून संस्था - महाविद्यालये अतिरिक्त शुल्क घेत असल्याच्या तक्रारी येत आहेत.

**काय आहेत प्रमुख नियम ?**

प्रत्येक संस्थेने त्यांच्या सर्व अभ्यासक्रमांचे शुल्क मराठी आणि इंग्रजी दोन्ही भाषांमध्ये संस्थेच्या वेबसाईटवर आणि सूचना प्रदर्शित करणे अनिवार्य. महाराष्ट्र विनाअनुदानित खासगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था अधिनियम, २०१५ फ नुसार, ठरवलेल्या शुल्कापेक्षा जास्त शुल्क घेणे 'नफेखोरी' मानले जाईल. अशा संस्थांवर कलम २० नुसार कारवाई केली जाईल. शासनाच्या योजनांसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांकडून शुल्क घेताना, त्यांना मिळणारी शिष्यवृत्ती वजा करूनच उर्वरित शुल्क घ्यावे.

**तक्रार निवारणासाठी हेल्पलाइन**

अतिरिक्त शुल्काची मागणी होत असल्यास, विद्यार्थी थेट तक्रार करू शकतील. त्यासाठी राज्य सामाईक परीक्षा कक्षाच्या वेबसाइटवर मदत दूरध्वनी क्रमांक आणि तिकीट लिंक उपलब्ध करून दिली आहे. यासाठी विद्यार्थी सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत ७७००९१९८९४ या क्रमांकावर संपर्क साधू शकतात.

यावर नियंत्रण मिळवण्यासाठी शासनाने ही पावले उचलली आहेत.

अशा परिस्थितीत विद्यार्थी हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधून आपली तक्रार नोंदवू शकणार आहे. ही नवीन नियमावली सर्व व्यावसायिक पदवी, पदव्युत्तर पदवी आणि पदविका या अभ्यासक्रमांच्या संस्था लागू असणार आहे.

**जाहीर प्रसिध्दीकरण** कि.अर्ज.नं. ६१/२०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे न्यायालयात**

विठ्ठल लक्ष्मण व्यवहारे, वय-६५ वर्षे,धंदा-शेती, रा.आष्टी,ता.मोहोळ, जि. सोलापूर. } अर्जदार

विरूध्द

ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत आष्टी, ता.मोहोळ,जि.सोलापूर. } सामनेवाला

ज्याअर्थी यातील अर्जदार विठ्ठल लक्ष्मण व्यवहारे यांची मुलगी संगिता विठ्ठल व्यवहारे हिचा जन्म मौजे आष्टी, ता. मोहोळ येथे वडिलांचे घरी दि.०१/०६/१९८२ रोजी झ गालेला आहे. परंतु तिच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत आष्टी, ता.मोहोळ, जि.सोलापूर यांचे जन्माचे रजिस्टरला झालेली नाही. अर्जदाराची मुलगी संगिता विठ्ठल व्यवहारे हिच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत आष्टी चे जन्माचे रजिस्टरला व्हावे याकरीता जन्म व मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्ज या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदाराची मुलगी संगिता विठ्ठल व्यवहारे हिच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत आष्टी, ता. मोहोळ यांच्या जन्माचे रजिस्टरला होण्याकरीता कोणाची कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत अथवा दि.१२/९/२०२५ रोजी समक्ष अथवा वकीलामार्फत कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत म्हणणे न आल्यास अर्जदारास त्यांचे अर्जातील मागणी प्रमाणे पुढील जरुर ते आदेश होतील याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानीशी दिले असे.ता. १८/८/२०२५

सही/-
शिक्का
तहसिलदार,मोहोळ.

**जाहीर प्रसिध्दीकरण** दि.कि.अर्ज.नं. ११०/२०२५ नि-१९

**सोलापूर येथील मे. सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर सो. (श्री. शिलवंत सो) यांचे कोर्टात**

१) श्रीमती अपर्णा सुभाष पाटील वय ४८ वर्षे, धंदा - घरकाम,
२) तनय सुभाष पाटील वय २६ वर्षे, धंदा- शिक्षण
दोघेही रा. ई/८८, सुंदरम नगर, महानगरपालिका शाळा नं. २८ जवळ, विजापूर रोड, सोलापूर } अर्जदार
३) विजय सुभाष पाटील वय २२ वर्षे, धंदा- कांही नाही, रा. ई/ ८८, सुंदरम नगर, महानगरपालिका शाळा नं. २८ जवळ, विजापूर रोड, सोलापूर
(याचे नैसर्गिक पालक म्हणून जनक आई अर्जदार नं.१)

विरूध्द

कोणी नाही } सामनेवाला

ज्याअर्थी, अर्जदार यांनी सदरचा अर्ज वारसा दाखला मिळणेकरिता दाखल केलेला आहे. वर कलम १ मधील भूखंड ही पुणे गृहनिर्माण क्षेत्र व विकास मंडळ, शिवाजी नगर, सोलापूर यांनी सतीश शिवानंद कल्याणी यांना अलॉट करण्यात आली होती. सतीश शिवानंद कल्याणी यांनी त्यांचे प्रापंचिक व आर्थिक अडचणीकरिता सदरील भूखंड १) सुभाष शंकरराव उर्फ शंकरअप्पा पाटील व २) सौ. अपर्णा सुभाष पाटील यांना हस्तांतरण करण्याचे ठरवून, त्याप्रमाणे मा. मिळकत व्यवस्थापक, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, आगरकर, पुणे- ४११००१ यांचेकडे दि. १६/०९/२००५ रोजी रितसर अर्ज दाखल केला होता. त्यानुसार मा. मिळकत व्यवस्थापक, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, आगरकर, पुणे- ४११००१ यांनी त्यांचेकडील दि. ०२/११/२००५ रोजीचे पत्रान्वये हस्तांतरणास परवानगी दिली. त्यानुसार श्री. सतीश शिवानंद कल्याणी यांनी १) सुभाष शंकरराव उर्फ शंकरअप्पा पाटील व २) सौ. अपर्णा सुभाष पाटील यांचे नांवे दि. ३०/११/२०१० रोजी नोंदणीकृत खरेदीखत दस्त क्र. १०३७५ अन्वये खरेदीने दिली आहे. त्याप्रमाणे १) सुभाष शंकरराव उर्फ शंकरअप्पा पाटील व २) सौ. अपर्णा सुभाष पाटील यांचे नावाची नोंद पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास महामंडळाच्या दप्तरी लागली आहे.

सदर मिळकतीचे सहधारक सुभाष शंकरराव उर्फ शंकरअप्पा पाटील हे अर्जदार नं. १ हिचे पती व अर्जदार नं. २ व ३ यांचे जनक पिता होते. सुभाष शंकरराव उर्फ शंकरअप्पा पाटील यांचे दि. २०/०७/२०१४ रोजी वांद्री, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथे निधन झाले आहे. सुभाष शंकरराव उर्फ शंकरअप्पा पाटील यांचे मृत्युपश्चात अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारसदार आहेत मयत कै. सुभाष शंकरराव उर्फ शंकरअप्पा पाटील हे खालील मिळकतीचे सहधारक आहेत.

जिल्हा व उपजिल्हा सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील मजरेवाडी येथील जुळे सोलापूर भाग-२ येथील पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, पुणे म्हाडामधील योजना २०/८६ नुसार उच्च उत्पन्न गट योजनेतील ''विशाल नगर'' या नावाने ओळखले जाणारे मधील भूखंड/गाळा क्र. ४७ याचे एकूण क्षेत्र ४८७.१७ चौ.मी. यांसी चतु:सिमा- पूर्वेस - भूखंड क्रमांक ३, दक्षिणेस-भूखंड क्रमांक ४६, पश्चिमेस रस्ता, उत्तरेस- नाला.

येणेप्रमाणे वरील नमूद मिळकत ही सुभाष शंकरराव उर्फ शंकरअप्पा पाटील यांचे वारसांच्या नावाची नोंद, पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, पुणे, महसूल दप्तरी व महानगरपालिकेच्या कर आकारणीमध्ये होणेकामी वारसा दाखला मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी जर कोणास वरील अर्जदार यांच्या नावाने वारसा दाखला देण्यासंबंधी कांही म्हणणे, हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत अथवा नेमलेली तारीख २३/०९/२०२५ रोजी मे. कोर्टात हजर राहावे. तसे न झाल्यास अर्जदार यांच्या नावाने वारस प्रमाणपत्रास कोणाची कांही हरकत नाही असे समजून अर्जदार यांचे नांवे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

ही जाहीर नोटीस माझ्या सहीनिशी व मे. कोर्टाच्या शिक्यानिशी दिली असे. ता. १९/०८/२०२५

सही/- सहा. अधिक्षक
सही/-लिपीक शिक्का दिवाणी न्यायाधिश व.स्तर सोलापूर

**जाहीर प्रसिध्दीकरण** दि.कि.अर्ज.नं. ४२०/२०२५ नि-५

**सोलापूर येथील मा. दिवाणी न्यायाधिश साहेब वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात**

१) श्री. गौरव दिलीप जुगदार
२) श्रीमती संगीता दिलीप जुगदार
३) श्री. उत्कर्ष दिलीप जुगदार } अर्जदार
सर्व रा. १८, यशवंतनगर, सोलापूर-३
४) श्रीमती दिपा सुधीर कांदे, रा. उपळाई रोड, बार्शी
५) श्रीमती सुजाता महादेव जुगदार, रा. बाळे, सोलापूर

विरूध्द

कोणी नाही } सामनेवाला

ज्याअर्थी यातील प्रस्तुत अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार (१) श्री. गौरव दिलीप जुगदार, (२) श्रीमती संगीता दिलीप जुगदार, (३) श्री. उत्कर्ष दिलीप जुगदार, (४) श्रीमती दिपा सुधीर कांदे आणि (५) श्रीमती सुजाता महादेव जुगदार, सर्वजण राहणार वरीलप्रमाणे हे श्री. महादेव गोविंद जुगदार (मयत) यांचे कायदेशीर वारसदार आहेत आणि मयताचे नांवे ङि व सब-ङि सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दीतील गांव/पेठ उत्तर सदर बझार टीपी स्कीम नं. ३ फायनल प्लॉट नं.११९/६३ यांसी ६६१३६२७४८६० भाग सोलापूर पैकी यशवंतनगर सहकारी गृहनिर्माण संस्था मधील प्लॉट नं.१८ याचे क्षेत्र ७४.३५ चौ.मी. अथवा ८००.३० चौ.फुट इतके असून रेकॉर्डवर मिळकत धारक म्हणून मयत श्री. महादेव गोविंद जुगदार यांचे नांवाची नोंद आहे. श्री. महादेव गोविंद जुगदार यांनी त्यांचे हयातीत त्यांच्या सदरील घरजागा प्लॉट स्थावर मालमत्ता मिळकतीसंदर्भात मृत्यूपत्र करुन ठेवलेले नसल्यामुळे मयताचे कायदेशीर वारस अर्जदार क्र. १ ते ५ असल्याचे व सदर मिळकतीवर अर्जदार नं. २ ते ५ यांचे विनाअट हक्कसोड पत्रानुसार सदरील मिळकतीला अर्जदार क्र.१ श्री गौरव दिलीप जुगदार यांचे एकट्याचे नांव वारसाहक्काने मिळकतीचे नोंदीस लावावे यासाठी वारस प्रमाणपत्र (Hereship Certificate) साठीचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी प्रस्तुत अर्जदार १ ते ५ व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस अर्जातील नमूद संपत्तीत नाही. प्रस्तुत अर्जदार यांना अर्जातील नमूद स्थावर मिळकतीत वारस म्हणून कोणाची हरकत अथवा वाद असल्यास त्यांनी दिनांक ०८/१०/२०२५ रोजी वकीलामार्फत अथवा समक्ष मे. कोर्टात हजर राहून लेखी हरकत अथवा वाद उपस्थित करावा. मुदतीत हरकत अथवा वाद उपस्थित न केल्यास मे. कोर्ट पुढील योग्य ते आदेश पारीत करेल. त्यांनतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सही/- सहा. अधिक्षक
सही/-लिपीक शिक्का दिवाणी न्यायालय व.स्तर सोलापूर

**जाहीर प्रसिध्दीकरण** क्रि.कि.अर्ज नं. २१५/२०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे न्यायालयात**

करण विष्णु कोळी, वय-१९ वर्षे,धंदा-मजुरी, रा.अंबाबाईवाडी, ता.बार्शी, जि. सोलापूर. } अर्जदार

विरूध्द

ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत भांबेवाडी, ता.मोहोळ,जि.सोलापूर. } सामनेवाला

ज्याअर्थी यातील अर्जदार करण विष्णु कोळी हा मौजे भांबेवाडी, ता. मोहोळ येथे आजोळी आईच्या माहेरी म्हणजेच मौजे भांबेवाडी येथील राहते घरी दि.१६/१०/२००६ रोजी जन्मलेला आहे. परंतु त्याच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत भांबेवाडी, ता.मोहोळ, जि.सोलापूर यांचे जन्माचे रजिस्टरला झालेली नाही. अर्जदाराच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत भांबेवाडी चे जन्माचे रजिस्टरला व्हावे याकरीता जन्म व मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्ज या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार करण विष्णु कोळी याच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत भांबेवाडी,ता.मोहोळ यांच्या जन्माचे रजिस्टरला होण्याकरीता कोणाची कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत अथवा दि. १२/९/२०२५ रोजी समक्ष अथवा वकीलामार्फत कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत म्हणणे न आल्यास अर्जदारास त्यांचे अर्जातील मागणी प्रमाणे पुढील जरुर ते आदेश होतील याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानीशी दिले असे. ता. १८/८/२०२५

सही/-
शिक्का
तहसिलदार,मोहोळ.

**जाहीर नोटीस** क्र.२०२५/ज.-मृ./ एस.आर./४३

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब, तथा दंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात**

अरविंद कटयाप्पा कांबळे, } अर्जदार

विरूध्द

ग्रामपंचयात कार्यालय कोरवली } सामनेवाला

ज्याअर्थी, यातील अर्जदार यांचे मयत आजोबा नामे मुकिंदा दादू कांबळे, यांची मृत्युची तारीख २६/०६/२००० रोजी रा. मु. पो. कोरवली ता.मोहोळ, जि. सोलापूर, येथील राहत्या घरी निधन झालेले आहे. सदरचा अर्ज अर्जदार यांनी त्यांचे आजोबा नामे मुकिंदा दादू कांबळे, यांचा मयत दाखला मिळणेकामी कलम १३ (३) जन्म-मृत्यु नोंदणी १९६९ प्रमाणे या मे. कोर्टात दाखल केलेला आहे. सदर मयतास अर्जदार हे सदर मयताचे एकमेव वारस असून त्यांचे व्यतिरिक्त इतर कोणीही नाही.

त्याअर्थी, सदर अर्जाचेकामी अर्जदार यांना त्यांच्या आजोबाचा मृत्यु दाखला मिळणेकामी कोणाची काही हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आंत किंवा नेमलेली तारीख - १२/९/२०२५ रोजी स्वत: अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाचीही काही हरकत अथवा म्हणणे न आल्यास कोणाचीही काहीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबधी दाखला देण्यात येईल.

हे आज दि.१९/८/२०२५ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्क्याने प्रसिद्धी केले असे.

सही/- क.लिपीक
शिक्का
सही/- तहसिलदार,मोहोळ.